सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १० मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




## संक्षिप्त वृत्त...

### जिल्हा पोलिस अधिक्षक व आयुक्तांनी विविध ठिकाणी दिल्या भेटी : आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील रस्त्यावर वारंवार होणारे अपघात व वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणांची पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, आयुक्त धैर्यशील जाधव, सार्वजनीक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता एस. एस. पाटील यांच्यासह अन्य अभियंता व अधिकारी यांनी गुरुवारी (दि.०८) संयुक्त पाहणी केली.

यावेळी शहरातील ओव्हर ब्रिज, गंगाखेड नाका, बस स्टँड परिसरास भेट दिली. या परिसरात वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणांची पाहणी केली. तसेच अपघात टाळण्यासाठी पोलीस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, आयुक्त धैर्यशील जाधव यांनी राष्ट्रीय महामार्ग विभाग व सार्वजनीक बांधकाम विभागाचे अभियंता यांना आवश्यक उपाययोजना करण्याच्या सुचना केल्या.

### माळी गल्लीत गट्टू रोडच्या कामाचे उद्घाटन

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील माळी गल्ली येथे गुरुवारी (दि.०८) राष्ट्रवादी काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष तथा प्रथम महापौर प्रताप देशमुख यांच्याहस्ते गट्टू रोडच्या कामाचे उद्घाटन करण्यात आले.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्व पदाधिकारी, युवक पदाधिकारी, सामाजिक न्याय विभाग, ओबीसी विभाग, सेवादल, अल्पसंख्यांक विभाग, पदवीधर विभागाचे सदस्य, सर्व कार्यकर्ते, मनपा सदस्य तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### इन्व्हर्टर बॅटरी चोर पोलिसांच्या ताब्यात

**परभणी,/प्रतिनिधी :** इन्वर्टर बॅटरी चोरास पोलिसांनी कारवाई करून ताब्यात घेतले. याप्रकरणी नवा मोंढा पोलीस ठाण्यात गुरुवारी (दि. ८) गुन्हा नोंद करण्यात आला.

आरोपी रितेश संतोष वायकोस (हल्ली मुक्काम समाधान नगर, परभणी) यास पोलिसांनी ताब्यात घेऊन गुन्हा संबंधात विचारपूस केले असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. दरम्यान पोलिसांनी त्याच्या ताब्यातून एक इन्व्हर्टर बॅटरी जप्त केली आहे. आरोपीस पुढील कारवाईसाठी नवा मोंढा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. कारवाई पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक राजू मुत्तेपोड, पोलीस उपनिरीक्षक गोपीनाथ वाघमारे, पोलीस अंमलदार सूर्यकांत फड, रवी जाधव, निलेश परसोडे व रफिक शेख यांच्या पथकाने केली.

### पोलीस अधीक्षक कार्यालयात खाजगी ट्रॅव्हल्स धारकांची बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील ट्रॅव्हल्स वाहतुक प्रश्नांविषयी येथील खाजगी प्रवासी ट्रॅव्हल्स संघटना व त्यांचे प्रतिनिधींसोबत पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

येथील जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयात घेण्यात आलेल्या या बैठकीस उप प्रादेशिक परीवहन आशिष पाराशरे, उप विभागीय पोलीस अधिकारी दिनकर हंबाळे, वाहतुक शाखा पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, स्थानिक गुन्हे शाखा पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, पोलीस स्टेशन कोतवाली पोलीस निरीक्षक संजय ननवरे, पोलीस स्टेशन नवा मोंढा पोलीस निरीक्षक दिपककुमार वाघमारे, जनसंपर्क अधिकारी सपोनि राजेश मलपिलु, तसेच वाहतुक शाखेतील अधिकार व अंमलदार उपस्थित होते.

शहरातील दैनंदिन वाहतूक करणारे खाजगी ट्रॅव्हल्स हे मोठ्या प्रमाणात शहरातील विविध ठिकाणी रस्त्यावर लागत असतात. तसेच एकाच ठिकाणी टॅव्हल्स प्रवाशांची गर्दी होत असते. या संदर्भाने असलेले प्रश्न व त्यानुसार दिर्घकालीन व अल्पकालीन सुधारणा व उपाय योजना या संदर्भाने या बैठकीत महत्वाची चर्चा झाली. तसेच यापुढे ट्रॅव्हल्स हे प्रवाशांना पिकअप ठिकाणांव्यतीरिक्त इतर टिकाणी शहरात कुठेही थांबणार नाहीत, असे ठरविण्यात आले.

### दुचाकी अपघातात एकाचा जागीच मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** राणीसावरगाव येथील रेणुका देवी कमानीकडे जात असलेला मार्गावर मारवाड गल्ली येथे भरधाव वेगाने जाणाऱ्या दोन दुचाकीची समोरासमोर धडक होवून झालेल्या अपघातात एकाचा जागीच मृत्यू झाला.

एम.एच.-१४. एफ.आर. ०७३७ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन बापुराव बळीराम जाधव (वय ५५ रा. मर्शिवनी तांडा ता. अहमदपूर जि. लातूर) तर एम.एच-४४ एन.ए. ९५४४ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन अन्य दोघेजण राणीसावरगाव येथील मारवाड गल्लीतून जात होते. यावेळी दोन्ही दुचाकींची समोरासमोर जोरदार धडक झाली. या अपघातात बापूराव जाधव यांचा मृत्यू झाला. तर दुसऱ्या गाडीवरील दोघांना काही प्रमाणात मार लागला. त्यांना उपचारासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र येथे दाखल केले असता समोरील व्यक्ती मृत्यू पावल्याचे पाहून तेथून ते फरार झाले. ते खंडाळी तांडा (ता. अहमदपूर) येथील रहिवासी असल्याची प्राथमिक माहिती आहे.

### जिजामाता ज्युनिअर कॉलेज चा १०० % टक्के निकाल

**सोनपेठ,/प्रतिनिधी-**येथील दर्जेदार आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा असलेल्या जिजामाता पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज चा बारावीचा निकाल दरवर्षीप्रमाणे याही वर्षी शंभर टक्के लागला असून कॉलेजने निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. बारावी विज्ञान शाखेतून कुमारी सुप्रिया सावंत या विद्यार्थिनीने ७० टक्के गुण मिळवून कॉलेजमधून प्रथम येण्याचा मान मिळवला. तसेच ज्ञानेश्वर नवघरे या विद्यार्थ्याने ६९% गुणासह द्वितीय क्रमांक मिळवला. तर आदित्य धोंडगे व अभिजीत हंचाटे या विद्यार्थ्यांनी ६८% गुण घेऊन तृतीय येण्याचा मान मिळवला. शंभर टक्के निकालाची परंपरा कायम ठेवल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष बाबुराव धोंडगे सचिव प्रा. डॉ . मुंजाभाऊ धोंडगे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच शाळेचे प्राचार्य डॉ गणेश जयतपाळ, अजय सर , मुख्याध्यापक विद्या बदले, सर्व शिक्षक शिक्षिका यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया

छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी

खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/ प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

९४ २३३२४६६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पाथरीत होणाऱ्या विविध विकास कामांच्या भूमिपूजनानिमित्त शिवसेनेच्या वतीने मंगल अक्षदाचे वाटप!





**पाथरी,/प्रतिनिधी-** अनेक वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पाथरीत सेलु कॉर्नर चौक येथे छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा साकारत असुन त्याचे भुमीपुजन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्या दिनांक ११ मे रोजी होणार आहे. पाथरी शहरातील सेलू कॉर्नर चौक परिसरात छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची गेल्या कित्येक वर्षापासून ची शिवसैनिकांची व शिवप्रेमी नागरिकांची मागणी होती. दोन वर्षांपूर्वी शिवसेना अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद भैया खान यांनी कार्यकर्त्यांना शब्द दिला होता तो क्षण उद्यावर येऊन ठेपला आहे. शिवप्रेमी नागरिकांची असलेली पुतळा उभारण्याची प्रतीक्षा उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते भूमिपूजन होऊन पूर्ण होत आहे. पाथरी साई तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी तब्बल ९१ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे यातील मंजूर साईबाबा मुख्य रस्त्याचे उद्घाटन,व यासोबतच श्रीराम मंदिर सभागृहाचे बांधकाम व सुशोभीकरण या महत्त्वपूर्ण कामांचे भूमिपूजन तसेच जनाजा नमाज हॉल उद्घाटन उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते व शिवसेना अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या मार्गदर्शनाखाली उदया दि.११मे रोजी होणार आहे. सायंकाळी जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावर सायंकाळी भव्य शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे संबंधित करणार आहे यासाठी व इतर कार्यक्रमासाठी सर्व शिवसैनिक व नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे. भूमिपूजन व उद्घाटनास उपस्थित राहण्यासाठी कार्यकर्त्याकडून मंगल अक्षदाचे वाटप! पाथरी शहरातील सेलू कॉर्नर चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुतळा उभारण्याची कित्येक वर्षाची असलेली शिवप्रेमी नागरिकांची मागणी उद्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन होऊन पूर्ण होणार असल्याने तसेच श्रीराम मंदिर विकास कामे व साईबाबा विकास आराखड्यातील विकास कामांचे भूमिपूजनासाठी सर्व नागरिकांनी उपस्थित राहण्यासाठी कार्यकर्त्याकडून घरोघरी जाऊन मंगल अक्षदांचे वाटप करून कार्यक्रमाचे निमंत्रण देण्यात आले.

### शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरु

**पाथरी,/प्रतिनिधी-** पाथरी येथे रविवारी होऊ घातलेल्या विविध कार्यक्रमानिमित्त महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेनाप्रमुख एकनाथ शिंदे आणि त्यांचे सुपुत्र खासदार श्रीकांत शिंदे आणि सोबत येत असलेल्या मान्यवरांच्या स्वागतासाठी साईबाबाची पाथरी नगरी सज्ज झाली आहे. या निमित्ताने होत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज भूमिपूजन सोहळा,जनाजा हॉल शुभारंभ,श्रीराम मंदिर विकास काम उद्घाटन, साईबाबा मुख्य रस्त्यांचे भूमिपूजन आणि शेवटी शिवसेना मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अल्पसंख्यांक प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या वतीने देण्यात आली होती.या कार्यक्रमाची जय्यत तयारी सुरू करण्यात आली असून,शिवसेना नेते सईद खान व त्यांचे बंधू असेफ खान याकडे जातीने लक्ष देत आहेत.जिल्ह्यातील सर्व शिवसैनिकांनी आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या लाडक्या बहिणींनी कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहण्याचे आव्हान शेवटी सईद खान यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जाती निहाय जनगणनेचा निर्णय म्हणजे काँग्रेसचा विजय

### रमेश चेन्नीथला यांचे प्रतिपादन : सद्भावना व संविधान पदयात्रेचा परभणीत समारोप

**परभणी,/प्रतिनिधी :** जाती निहाय जनगणनेचा केंद्र सरकारचा निर्णय म्हणजे पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी सातत्याने लावून धरलेल्या मागणीचा विजय होय, असे मत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी परभणीत व्यक्त केले. भारतीय जनता पार्टी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जाती धर्माच्या नावावर विष पसरवुन समाजात दुही माजवण्याचे काम करत आहे, अशी टीकाही केली.

काँग्रेस पक्षाच्यावतीने परभणी जिल्ह्यात काढण्यात आलेल्या दोन दिवसीय सद्भावना पदयात्रा आणि संविधान बचाव रॅलीनिमित्त अक्षदा मंगल कार्यालयाच्या सभागृहात सोमवारी (दि. ५) दुपारी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विधानसभेतील काँग्रेसचे गटनेते विजय वडेट्टीवार, राज्यसभा सदस्य खासदार चंद्रकांत हंडोरे, खासदार प्रणिती शिंदे, खासदार रवींद्र चव्हाण, खासदार कल्याण काळे, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी आरिफ नसीम खान, माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री अनिल पटेल, यात्रेचे समन्वयक तथा पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष मोहन जोशी, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव कुणाल चौधरी, माजी मंत्री राहुल बोंद्रे, आमदार अमित झनक, माजी आमदार कैलास गोरंट्याल, काँग्रेस सेवा दलाचे प्रदेशाध्यक्ष विलास औताडे, इनटकचे प्रदेशाध्यक्ष कैलास कदम, अल्पसंख्यांक विभागाचे विभागीय अध्यक्ष वजाहद मिर्झा, ओबीसी विभागाचे अध्यक्ष भानुदास माळी, प्रदेश सरचिटणीस ब्रिजदत्त, जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुरेश वरपूडकर, माजी आमदार सुरेशदादा देशमुख, प्रदेश काँग्रेस समितीचे उपाध्यक्ष माजी खासदार ॲड. तुकाराम रेंगे पाटील, माजी उपमहापौर भगवानराव वाघमारे, महानगर जिल्हाध्यक्ष नदीम इनामदार, प्रदेश काँग्रेसच्या अनुसुचित जाती विभागाचे अध्यक्ष सिध्दार्थ हत्तीअंबीरे, प्रदेश उपाध्यक्ष बाळासाहेब देशमुख, तालुकाध्यक्ष बाळासाहेब रेंगे पाटील, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष श्रीधर देशमुख, युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अमोल जाधव, सुहास पंडीत, अजय चव्हाण, अभय देशमुख, तुकाराम साठे, माजी नगरसेवक गणेश देशमुख, माजी नगरसेवक सुनील देशमुख, गुलमीर खान, विनोद कदम, रवि सोनकांबळे, मोईन मौली, मेहराज कुरेशी, दुर्राणी खानम, प्रवीण सोनटक्के, नागसेन भेरजे, माधव दाभाडे, सत्तार पटेल, अब्दुल सईद, व्यंकटेश काळे, सजी अहेमद खान यांच्यासह अन्य नेते व पदाधिकारी व्यासपीठावर विराजमान होते.

आपल्या भाषणातून चेन्नीथला यांनी प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ याचे सद्भावना पदयात्रा काढल्याबद्दल अभिनंदन केले. हा उपक्रम पक्षास उभारी देणारा आहे, असे ते म्हणाले. काँग्रेसच्या संघटनात्मक बांधणीसह आगामी निवडणूकांच्या दृष्टीने असे उपक्रम निश्चितच पुरक ठरतील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी केंद्र सरकारवर जोरदार टिका टिप्पणी करतेवेळी चेन्नीथला यांनी पक्षाचे नेते राहुल गांधी यांच्या दबावामुळेच मोदी सरकारने जातीय जनगणनेचा निर्णय घेतला आहे, असे स्पष्ट केले. राहुल गांधी यांनी ही मागणी सातत्याने लावून धरली. परंतु, मोदी सरकारने त्यांच्या या मागणीकडे सातत्याने कानाडोळा केला. परंतु, गांधी यांच्या या मागणीचा अखेर मोदी सरकारला गांभीर्याने विचार करावा लागला व जातनिहाय जनगणनेचा निर्णय घ्यावा लागला. मोदी सरकारचा हा निर्णय म्हणजे काँग्रेसजणांचा विजय आहे, असे मत चेन्नीथला यांनी व्यक्त केले. जाती निहाय जनगणना मोदी सरकारने तात्काळ सुरू करून त्याची अंमलबजावणी करावी, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. मात्र नरेंद्र मोदी हे जातीय जनगणना कधी करणार? त्याची अंमलबजावणी कधी करणार? जनगणना किती कालावधीत पूर्ण करणार? याची उत्तरे देत नाहीत, अशी उपरोधिक टीका ही चेन्नीथला यांनी यावेळी केली.

### एकलव्यची विद्यार्थिनी साक्षी लांडगु जिल्ह्यातून प्रथम

**जिंतूर,/प्रतिनिधी :** एकलव्य बाल विद्यामंदिर माध्यमिक शाळेची विद्यार्थिनी साक्षी प्रशांत लांडगु हिने युवा मास्टर स्ट्रोक ऑल इंडिया ड्रॉइंग कॉम्पिटिशन ब गटामध्ये जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला.

शाळेचे मुख्याध्यापक गीते एस. पी . यांनी पुष्पगुच्छ देऊन तिचे अभिनंदन केले. भागीरथी जीवनधारा प्रतिष्ठान लहानेवाडी तालुका रेनापुर जिल्हा लातूर या संस्थेचे सहसचिव गोविंद रंगनाथराव लहाने यांनी साक्षीला कलाक्षेत्रात प्रगती साधून जीवन फुलवावे अशा शुभेच्छा देऊन मार्गदर्शक शिक्षक सुधन सानप यांचे अभिनंदन केले.



### डॉ.संजय रोडगे यांच्याअभिष्टचिंतन सोहळा उत्साहात साजरा



**सेलू-** बुधवार रोजी सेलू कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा श्रीराम प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष डॉ.संजयजी रोडगे यांचा अभिष्टचिंतन सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव डॉ. सविता रोडगे अध्यक्ष आदरणीय डॉ. रामराव रोडगे (भाऊ) डॉ. गणेश पारवे, डॉ. अपूर्वादीदी पारवे- रोडगे, मा. अशोक पटवारी, मा. प्रफुल्ल बिनायके आदींची उपस्थिती होती.

वाढदिवसानिमित्त उपजिल्हा रुग्णालय या ठिकाणी रुग्णांना फळ वाटप करण्यात आले. त्याचबरोबर घटक संस्थेतील सर्व प्राचार्य, मुख्याध्यापकव शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने साहेबांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ. मिनिक्षी रत्नपारखी यांनी केले. यावेळी श्री. अशोक बोडखे व अशोक पटवारी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच दिनांक १४ मे २०२५ रोजी सायं. ०६:०० वाजता श्री. ह. भ. प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदोरीकर) यांचा हरिकीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डिगाबर टाके व सौ. कल्पना भाबट यांनी केले तर आभार श्री. आकात यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी घटक संस्थेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

### जिल्हयात वाढला उन्हाचा पारा

**परभणी-** शहरासह जिल्हयात गेल्या दोन दिवसापासून उन्हाचापारा चांगलाच वाढलेला दिसून येत आहे. त्यातच नागरिकांना उन्हातून ये-जा करण्यासाठी मोठया कसरतीच कराव्या लागत असल्याचे चित्र समोर आले आहे.

### संत भगवानबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९८.३३ टक्के असुन शाळा प्रथम

**जिंतूर-** येथील संत भगवानबाबा कनिष्ठ महाविद्यालयाचा फेब्रु/मार्च २०२५ च्या बारावी बोर्ड परीक्षेतील विज्ञान शाखेचा निकाल १०० टक्के तर कला शाखेचा निकाल ९५.६५ टक्के लागला असून महाविद्यालयाचा एकूण निकाल ९८.३३ टक्के एवढा लागला आहे.

विज्ञान शाखेत ७४ पैकी ७४ आणि कला शाखेत ४६ पैकी ४४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. या कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल हा परभणी जिल्ह्यातील सर्व विजाभज कनिष्ठ महाविद्यालया मधून सर्वात जास्त लागलेला आहे. तसेच महाविद्यालयाने उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखल्याची माहिती प्राचार्य श्री रमेश दराडे यांनी दिली. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष श्री प्रतापराव घुगे, सचिव केशव घुगे, संचालक श्री विठ्ठल घुगे, प्राचार्य श्री रमेश दराडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन केले.




## अवैध वाळूच्या चोरट्या वाहतुकीवर कारवाई जिल्ह्यात ठिकठिकाणी पथकाचे छापे मोहिम

**मोहन धारासूरकर**

**परभणी ,/प्रतिनिधी-** मागील काही दिवसांपासून पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पथकांच्या वतीने वाळूची चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर, आरोपींवर कारवाई करण्यात येत आहे. यातच बुधवारी पोलीस पथकांनी पाथरी, पालम परिसरात वाळूची चोरटी वाहतूक केल्या प्रकरणी वाहनांवर कारवाई करून आरोपींवर गुन्ह्यांची नोंद केली आहे.



पाथरी परिसरातील विटा शिवारातून लिंबा गावाजवळ पोलिसांनी केलेलया कारवाईत अनाधिकृतपणे वाळूची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ताब्यात घेण्यात आला. या प्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई गोपीनाथ वाघमारे, विलास सातपुते, संजय घुगे, मधुकर ढवळे,गजानन क्षीरसागर यांच्या पथकाने केली.

गंगाखेड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पालम तालुक्यातील खुरलेवाडी येथे अवैध वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरवर पोलीस पथकाने कारवाई केली. या प्रकरणी गंगाखेड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला.

यात तीन लाख रूपयांच्या वाहनांसह सात हजारांची वाळू असा एकूण ३ लाख ७ हजारांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणात गंगाखेड पोलीस ठाण्यात आरोपींविरूध्द गुन्हा नोंद करून आरोपीस ताब्यात घेण्यात आले. ही कारवाई कागणे, परसोडे, गायकवाड, निलपत्रेवार, सावंत यांच्या पथकाने केली.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर शनिवार, दि. १० मे २०२५ वर्ष - तिसरे अंक ३८ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## नाथसागर धरणावर प्रवेश बंदी; सुरक्षितेसाठी की ठेकेदारासाठी.?



तभा वृत्तसेवा

पैठण दि ०९:- भारत पाकिस्तान युद्ध तणाव परिस्थितीचा फायदा घेऊन नाथसागर जलाशयावर (जायकवाडी धरण) इरिगेशन डीपारमेंटने शुक्रवार दिनांक ९ मे पासून पर्यटकांना प्रवेश बंद केल्याचे बोलले जात असून धरणावर सुरू असलेली विकास कामे गुत्तेदाराला थातुरमातुर पध्दतीने करण्यास मदत होईल म्हणून धरणावर प्रवेश बंद करण्यात आल्याचे चित्र दिसत आहे.

दहशतवाद्यांच्या हिटलिस्टवर असलेले जायकवाडी धरणावर काही दिवसांपूर्वी एटीएस पथकाने भेट देऊन धरणावरील सुरक्षिततेची माहिती घेतली होती. अश्यात शुक्रवार दिनांक ९ मे पासून पर्यटक तसेच स्थानिक नागरिकांसाठी धरणाच्या मुख्य प्रवेशव्दार येथून प्रवेश बंद केला आहे. याबाबत धरणाचे अभियंता विजय काकडे यांच्याशी संपर्क केला असता भारत पाकिस्तान युद्ध वातावरण तसेच धरणावर सुरू असलेल्या विकास कामात अडथळा होणार नाही म्हणून या दोन्ही कारणासाठी धरणावर प्रवेश बंद करण्यात आल्याची माहिती काकडे यांनी दिली. नाथसागर जलाशयावर सध्या कोट्यवधी रुपयांची दर्जाहीन कामे सुरू असून याठिकाणी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी होत आहे.

## उरीमध्ये पाकिस्तानचा पुन्हा गोळीबार, पंतप्रधान मोदींची तीन्ही सैन्याध्यक्षांसह बैठक

नवी दिल्ली: पाकिस्तानकडून सीमेपार पुन्हा एकदा जोरदार गोळीबार सुरू झाला आहे. उरी सेक्टरमध्ये शुक्रवारी संध्याकाळी शस्त्रसंधीचे उल्लंघन करण्याची घटना समोर आली आहे. येथे पाकिस्तानकडून जोरदार गोळीबार केला जात आहे.



भारत आणि पाकिस्तानातील वाढत्या तणावादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या निवासस्थानी तीनही सैन्याध्यक्षांसोबत महत्त्वाची बैठक घेतली जात आहे. या बैठकीत नौदल प्रमुख, हवाईदल प्रमुख आणि लष्कर प्रमुखांसोबत सीडीएसही उपस्थित आहेत. थोड्या वेळाआधी परराष्ट्र मंत्रालयाने पत्रकार परिषद घेतली. या महत्त्वाच्या बैठकीत एनएसए अजित डोवाल यांचा समावेश आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंहही बैठकीत सामील होण्यासाठी थोड्या वेळाआधी पंतप्रधानांच्या निवासस्थानी पोहोचले आहेत.

पाकिस्तानला न डिवचताही त्यांनी ड्रोन आणि मिसाईल हल्ला केला - व्योमिका सिंह

विंग कमांडर व्योमिका सिंह यांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ मे रात्री साडेआठ वाजता पाकिस्तानने भारतावर कोणत्याही कारणाशिवाय ड्रोन आणि मिसाईल हल्ला केला. तसेच यानंतर आपल्या नागरी हवाई क्षेत्र बद केले नाही. पाकिस्तानने मुद्दामहून नागरिक विमानांना ढालच्या रूपात वापरले. त्यांना माहीत होते की त्यांनी हल्ला केल्यानंतर भारताकडून तात्काळ एअर डिफेन्सकडून प्रत्युत्तर मिळेल.

### आमदार जाधवांनी घेतली आढावा बैठक

## घरकुल व रोजगार हमी योजनेचा घेतला आढावा



तभा वृत्तसेवा

कन्नड :दि.०९ मे - तालुक्यात सुरु असलेल्या घरकुल टप्पा नंबर २ व महात्मा गांधी रोजगार हमी योजनेच्या कामाचा आढावा घेण्यासाठी आमदार संजना जाधव यांच्या कार्यालयात त्यांच्या अध्यक्षतेखाली दि . ८ मे रोजी दुपारी ४ वा गुरवार रोजी बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार जाधव यांना घरकुला विषयी व पंचायत समितीच्या विविध लाभाच्या योजना संदर्भात लाभार्थ्यांच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या होत्या याबाबत संबंधितांना निर्देश देऊन लवकरात लवकर निवारण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पाणीटंचाईचा आढावा घेऊन उपयोजना संदर्भात माहिती घेतली तसेच रोजगार हमी संदर्भात वैयक्तिक लाभाच्या योजनांचे मस्टर सुरू करण्यास सांगितले. यावेळी बैठकीस गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे,पंचायत समिती कार्यालयाचे सर्व कर्मचारी ज्ञानेश्वर निकम, सिद्धेश्वर झाल्टे, कल्याण पवार, गणेश शिंदे, डॉ. सदाशिव पाटील, कृष्णा बोरसे, यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

## मुख्यमंत्र्यांनी घेतला राज्यातील सुरक्षा, सज्जतेचा आढावा



मुंबई : भारत आणि पाकिस्तान यांच्या दरम्यान वाढत असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पोलिस आणि प्रशासकीय यंत्रणेकडून राज्यातील सुरक्षा आणि सज्जतेचा आढावा घेतला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी उपस्थित होते.

मॉकड्रिल, ब्लॅकआऊट इत्यादी सर्वच बाबतीत समग्र आढावा घेताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी विविध दिशानिर्देश दिले. प्रभारी मुख्य सचिव राजेशकुमार, राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला, मुंबई पोलिस आयुक्त देवेन भारती, मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, नागरी सुरक्षाचे अतिरिक्त पोलिस महासंचालक प्रभातकुमार, गृहविभागाच्या प्रधान सचिव राधिका रस्तोगी, गुप्तवार्ता विभागाचे अतिरिक्त पोलिस महानिरीक्षक शिरीष जैन, मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हाधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेले निर्देश पुढीलप्रमाणे...

- राज्यातील महत्वाच्या पदांवर विशेषतः आरोग्य, आपत्ती व्यवस्थापन इत्यादी विभागांतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या सुट्ट्या रद्द.

- प्रत्येक जिल्ह्यात मॉकड्रिल करा आणि जिल्हा स्तरावर वॉर रूम स्थापित करा.

- ब्लॅकआऊटवेळी हॉस्पिटलसोबत समन्वय यंत्रणा उभी करा. टार्गेट होऊ नये म्हणून लाईट बंद केले जातात, त्यामुळे पर्यायी विद्युत व्यवस्थेद्वारे यंत्रणा सुरू ठेवून, गडद रंगाचे पडदे अथवा गडद रंगाच्या काचा वापरून त्याचवेळी बाहेरून लाईट दिसणार नाही, अशी व्यवस्था करा.

- ब्लॅकआऊट म्हणजे काय आणि अशावेळी काय करावे, यांचे व्हिडिओ विद्यार्थी, नागरिकांपर्यंत पोहोचवा. व्यापक जनजागरण करा.

- केंद्र सरकारच्या 'युनियन वॉर बुक' चे सखोल अध्ययन करीत सर्वांना त्याची माहिती द्या.

- प्रत्येक जिल्ह्यात पोलिसांच्या सायबर सेलने समाजमाध्यमांवर देखरेख ठेवत पाकिस्तानला मदत करणारे हॅण्डल ओळखून त्यावर कारवाई करा. शत्रूला मदत करणारी अथवा चुकीची माहिती कुणी प्रसारित करीत असेल तर त्यावर कारवाई करा.

- प्रत्येक जिल्हाधिकारी यांना आपत्कालीन फंड आजच देणार, ज्यातून काही तातडीच्या साहित्याची खरेदी करायची असतील तर ती तत्काळ करता येईल. याव्यतिरिक्त कोणताही महत्वाचा प्रस्ताव यासंदर्भात आला तर तो १ तासात मंजूर करा.- एमएमआर क्षेत्रातील सर्व महापालिकांची बैठक घ्या, त्यांनाही 'ब्लॅकआऊट' बाबत जागरूकता निर्माण करण्यास सांगा. यामध्ये सहकारी गृहनिर्माण संस्थांना सहभागी करून घ्या.

- पोलिस विभागाने नेहमीपेक्षा जास्त जागरूकता ठेवावी. देशद्रोही व्यक्तींच्या कारवाया वाढण्याची शक्यता पाहता अधिक कोंबिग ऑपरेशन करा आणि गस्त अधिक चोख करा.

- सैन्याच्या तयारी संबधित गतिविधीचे चित्रिकरण करणे आणि ते समाजमाध्यमांवर प्रसारित करणे हा गुन्हा आहे, त्यावर तत्काळ गुन्हे दाखल करा.

- सागरी सुरक्षा वाढविण्यासाठी आवश्यकतेनुसार फिशिंग ट्रॉलर्स भाड्याने घ्या

- नागरिकांना परिस्थितीबाबत अद्ययावत व खरी माहिती पोहोचवणे यासाठी शासनाकडून व्यवस्था उभी करा.

- शासनाच्या अतिमहत्वाच्या पायाभूत सुविधा (उदा. विद्युतनिर्मिती, वितरण) यावर सायबर हल्ले होण्याची शक्यता लक्षात घेता सायबर विभागाकडून त्वरित सायबर ऑडिट करून घ्या

- सरकार आणि सुरक्षा यंत्रणा यात अधिक समन्वयासाठी मुंबईतील सैन्याचे तिन्ही दल तसेच कोस्टगार्डच्या प्रमुखांना पुढील बैठकीत व्हीसी माध्यमातून निमंत्रित करा.

## बिडकीन येथे महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी



बिडकीन दि ९ में पैठण तालुक्यातील बिडकीन येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आज दि ९ मे रोजी सकाळी दहा वाजता हिंदू सुर्य वीर शिरोमणी योद्धा महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ व्या जयंती उत्साहात साजरी करण्यात आली, या प्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, सरपंच अशोक धर्मे यांच्या हस्ते शिरोमणी योद्धा महाराणा प्रतापसिंह प्रतिमेचे पूजन करुन पुष्पहार घालून अभिनंदन करण्यात आले, यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण, सरपंच अशोक धर्मे, मनोज पेरे, काकासाहेब टेके,सागर फरताळे, अविनाश राठोड, ज्ञानेश्वर कांबळे, अमोल कोथिंबिरे, रमेश शिंदे,मनोज मुरदारे, मोहन हिवाळे, ज्ञानेश्वर रहाटवाडे, लक्ष्मण रहाटवाडे, दिलीप घून, वालचंद सुनावत ,भालचंद घुनावत, डॉ गणेश शिंदे,सोनाजी गवारे, वकील सतीश हाडे, राहुल ठाणगे,विजय शेळके, अंकुश धर्मे, गोपीचंद चुंगडे, तसेच जयंती आयोजक भागवत ठाकूर,गोटीराम चरांडे, संतोष इंगळे, प्रकाश गुण,काळूराम मुराडे,विजय मुराडे, गणेश कालवत,रंजीत चरांडे, आदी मान्यवर, व समाज बांधव, नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## किया इंडियाकडून कॅरेन्स क्लॅव्हिस लाँच

नवी दिल्ली: किया इंडिया या आघाडीच्या मास-प्रीमियम कारमेकरने कॅरेन्स पोर्टफोलिओमधील नवीन कार 'कॅरेन्स क्लॅव्हिस'च्या लाँचची घोषणा केली आहे. ही बिग, बोल्ड आणि स्पेसिअस ३-रो (तिसऱ्या रांगेतील सीटमध्ये ऐसपैस जागा) वेईकल आहे. कॅरेन्स क्लॅव्हिस आजच्या मोठ्या, आधुनिक कुटुंबांसाठी डिझाइन करण्यात आली आहे, जी एमपीव्ही आणि एसयूव्हींमधील तफावत दूर करते. या वेईकलमध्ये आरामदायीपणा, ऐसपैस जागा व आकर्षक डिझाइनसह प्रगत तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि भविष्यवादी आकर्षकता आहे. 'क्लॅव्हिस' नाव लॅटिन वाक्य क्लॅव्हिस ऑरियामधून घेण्यात आले आहे.

## जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील अति-जोखमीची ठिकाणे सुरक्षित

पुणे: अपघाताचा धोका लक्षणीयरीत्या कमी करण्याच्यादृष्टीने, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी) लिमिटेड, महाराष्ट्र महामार्ग पोलिस आणि हायवेज इन्फ्रास्ट्रक्चर ट्रस्ट यांच्या सहकार्याने सेव्हलाइफ फाउंडेशनने राष्ट्रीय महामार्ग - ४८च्या जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरील १५ मृत्यूप्रवण ठिकाणांवर रस्ते सुरक्षा उपाययोजना केल्या आहेत. सेव्हलाइफच्या झिरो फॅटॅलिटी कॉरिडॉर कार्यक्रमाचा एक भाग असलेल्या या उपक्रमात, अपघात आणि मृत्यूची मूळ कारणे हाताळण्यास प्राधान्य देत रस्ते अभियांत्रिकी, अंमलबजावणी आणि आपत्कालीन प्रतिसाद यामध्ये सकारात्मक हस्तक्षेपाला प्राधान्य देण्यात आले.

## टोयोटा किर्लोस्कर ची नवीन गाडी बाजारात



संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटरने भारतीय बाजारात टोयोटा अर्बन क्रूझर टैसर चारचाकी वाहन बाजारात आपला दबदबा निर्माण केला आहे , ती आकर्षक डिझाइन, प्रगत वैशिष्ट्ये आणि उत्कृष्ट ड्रायव्हिंग अनुभवासाठी प्रसिद्ध आहे. १.० लिटर टर्बो, १.२ लिटर पेट्रोल आणि ई-सीएनजी अशा पॉवरट्रेन पर्यायांमध्ये उपलब्ध या एसयूव्हीची किंमत ७.७३ लाख (एक्स-शोरूम) रुपयांपासून सुरू होते. अर्बन क्रूझर टैसरमध्ये टोयोटा आय-कनेक्ट सिस्टीम, स्मार्टवॉच व व्हॉईस असिस्टंट (हे सिरी) सपोर्ट, रिमोट लॉक/अनलॉक, क्लायमेट कंट्रोल, हेडलॅम्प ऑन/ऑफ कंट्रोल, व्हेईकल लोकेशन व हेल्थ ट्रॅकिंग सारखी वैशिष्ट्ये मिळतात.

सुरक्षेच्या दृष्टीने यात ६ एअरबॅग्स, व्हेईकल स्टॅबिलिटी कंट्रोल, हिल होल्ड असिस्ट, रोल ओव्हर मिटीगेशन, सीटबेल्ट रिमाइंडर (सर्व जागांसाठी), खडजत्रखद चाइल्ड सीट माउंट्स, एबीएस आणि ईबीडी, रिअर डिफॉगर, अँटी-थेफ्ट अलार्म सिस्टीम, डोअर/लाइट/बॅटरी अलर्ट, वेग सिग्नल, व्हॅलेट मोड, फाइंड माय कार आणि वेहिकल हेल्थची माहिती देणारी प्रणाली यांचा समावेश आहे.

ग्राहकांसाठी ही कार कॅफे व्हाईट, एनटायसिंग सिल्व्हर, स्पोर्टिन रेड, ल्यूसेंट ऑरेंज, गेमिंग ग्रे, मिस्टिक पर्ल व्हाइट, ग्रे, ब्लॅक व सिल्व्हर अशा सिंगल व ड्युअल टोन रंगांमध्ये उपलब्ध आहे. विविध ट्रिम्समध्ये किंमती ७.७३ लाख रुपयांपासून १३.०३ लाख रुपयांदरम्यान आहेत. शरयू टोयोटा वाळदगाव वाळूज छत्रपती संभाजीनगर येथे उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर.**

दि.कि.अर्ज क.३६२/२०२५

अर्जदार : १. लता भ्र. खंडु बोराडे, वय ४६ वर्ष, धंदा, घरकाम, रा. वडगाव (रामपुरी) पो. अंबेलोहळ, ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर. २. शिला भ्र. ज्ञानेश्वर गावंडे, वय ३६ वर्ष, धंदा, घरकाम, रा. अंबेलोहळ ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर. ३. मुक्ता भ्र. ज्ञानेश्वर तुपे, वय ३४ वर्ष, धंदा, घरकाम, रा. पाथरी, देवगावरंगारी, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर. ४. विलास पि. खंडु बोराडे, वय ३० वर्ष, धंदा, शिक्षण, रा. वडगाव (रामपुरी) पो. अंबेलोहळ ता. गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर ५. दिपक पि. खंडु बोराडे, वय २२ वर्ष, धंदा, शिक्षण, रा. वरील प्रमाणे ६. विकास पि. खंडु बोराडे, वय १९ वर्ष, धंदा, शिक्षण, रा. वरील प्रमाणे.

विरूध्द

गैरअर्जदारः निरंक

प्रकरणः- वारस प्रमाणपत्र (हेअरशिप प्रमाणपत्र) मिळणे करीता अर्ज.

ज्या अर्थी अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड.टी.व्ही. कोल्हे यांचे मार्फत न्यायालयात अर्ज दाखल केला की, अर्जदार क. १ हीचे पती व अर्जदार क. २ ते ६ यांचे वडील नामे खंडु कचरू बोराडे हे दिनांक १३/०२/२०२३ रोजी मयत झालेले आहेत. मयत खंडु याना कुसुमबाई खंडु बोराडे ही पहीली पत्नी होती मयत खंडु व कुसुमबाई यांची अर्जदार क. २ ते ४ ही मुले व मुली असुन कुसुमबाई ही दिनांक ३१/०३/१९९८ रोजी मयत झालेली आहे. अर्जदार क. १ ही मयत खंडू यांची दुसरी पत्नी असुन अर्जदार क. ५ व ६ ही मयत खंडु व अर्जदार क. १ चे मुले आहेत. मयत खंडु यांचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहे. मयत खंडु बोराडे यांना अर्जदार हे एकमेव वारस असुन या अर्जदारां व्यतीरिक्त इतर कुणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामाकरीता ते मयत खंडु यांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप प्रमाणपत्र) आवश्यकता आहे.

त्याआर्थी तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, ज्या कुणास अर्जदारांनी विनंती केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यास आक्षेप उजर असेल त्यांनी सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसांच्या आत तसा लेखी आक्षेप या मा. न्यायालयात दाखल करावा अन्यथा कायदयाप्रमाणे पुढील आदेश पारित करण्यात येईल करीता हे जाहीर प्रगटन आज दिनांक ९/०५/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी प्रसिध्द केले.

आदेशानुसार
सहा अधिक्षक
दिवाणी न्यायालय क.स्तर गंगापुर ता. गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क ३३३/२०२५

अर्जदार :- नामदेव उमाजी भागवत, वय ५६ वर्षे, धंदा. शेती, रा. धनगर गल्ली, वाळुज ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार :-निंरक

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, उमाजी शेकु भागवत हे वाळुज ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. ०६/०९/२०१६ रोजी वाळुज ता. गंगापूर येथे मयत झाले असून त्यांची पत्नी नामे रंगुबाई उमाजी भागवत ही देखील दि. १४/०३/२०२३ रोजी वाळुज ता. गंगापूर येथे मयत झालेली आहे. मयत उमाजी शेकु भागवत व रंगुबाई उमाजी भागवत यांना अर्जदार मुलगा असून मयतांना अर्जदार व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारास शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हा मयत उमाजी शेकु भागवत व रंगुबाई उमाजी भागवत यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारास हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारास करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायालयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

क. लिपिक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क. ३५८/२०२५

अर्जदार : १) राधिका भ्र. रोहिदास जाधव वय ३८ वर्ष धंदा व्यापार रा. फतियाबाद ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) तुषार पिता रोहिदास जाधव १५ वर्ष अज्ञान पालन कर्ती आई राधिका भ्र. रोहिदास जाधव वय ३८ वर्ष धंदा व्यापार रा. फतियाबाद ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) श्रावणी पिता रोहिदास जाधव १३ वर्ष अज्ञान पालन कर्ती आई राधिका भ्र. रोहिदास जाधव वय ३८ वर्ष धंदा व्यापार रा. फतियाबाद ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ४) परीगाबाई भ्र. वसंतराव जाधव वय ६२ वर्ष धंदा घरकाम रा. फतियाबाद ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदारः निरंक

प्रकरणः हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

मयत रोहिदास वसंत जाधव हे फतीयाबाद ता. गंगापूर येथील रहिवाशी होते ते दिनांक १९/०४/२०२५ रोजी राहते गावी अल्पशा आजाराने मयत झाले. अर्जदार क्र. १, हि अर्जदार क्र. २ व ३ ची आई असून मयताची पत्नी आहे व अर्जदार क्र. ४ हे अर्जदार क्र. १ ची सासू असून मयत रोहिदास वसंत जाधव ची आई आहे वरील सर्व नमुद ठिकाणचे रहिवाशी आहेत. मयत रोहिदास वसंत जाधव यांना अर्जदार क्र. १ ते ४ हेच कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयत रोहिदास वसंत जाधव यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाहीत.

२) असे की. मयत रोहिदास वसंत जाधव यांचेकडे भारत पेट्रोलियम कार्पोरेशन चा पेट्रोल पंप असून सदरील कंपनी सोबत दिनांक २०/०३/२०२५ रोजी उ्झडङ करारनामा आधारे डीलरशिप घेतली होती व फतीयाबाद येथे पाटील फ्युल स्टेशन या नावाने सदरचा पेट्रोल पंप आहे

सदरील डीलरशिप पुढे चालविण्या कामी भारत पेट्रोलियम कार्पोरेशन यांनी २४/०४/२०२५ रोजी अर्जदारासोबत पत्रव्यवहार केला असून तीन महिन्याच्या आत वारसप्रमाणपत्र सादर करण्याचे कळविले आहे. तसेच शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामाकरीता मयत रोहिदास वसंत जाधव यांचे वारस प्रमाणपत्राची (हेअरशिप सर्टिफिकीट) ची आवश्यक असल्याने अर्जदार क्र. १ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराचा अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असेल तर संबन्धीतानी त्यांचा असलेला आक्षेप उजर या न्यायालयात व्यक्तिश अथवा विधीज्ञ मार्फत हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नोंदवावा मुदतीनंतर आलेला आक्षेप उजर गृहीत धरला जाणार नाही. व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात मागणी प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील.

करिता हे जाहीर प्रगटन माझ्या सही व शिक्क्याने आज दिनांक /०५/२०२५ रोजी दिले.

लिपिक — सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. एस. एस. अग्रवाल, सह. दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ३६७/२०२५ पुढील तारीख ०२/०७/२०२५

अर्जदार -१) नजीर पिता सालार साय्येद वय ७९ वर्षे, धंदा मजूरी रा. शक्करभाई मोहल्ला, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) मजिद पिता नजीर सय्यद वय ४७ वर्षे, धंदा मजूरी रा. शक्करभाई मोहल्ला, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) रशीद पिता नजीर सय्यद वय ४० वर्षे, धंदा मजूरी रा. शक्करभाई मोहल्ला, लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ४) नशीब पिता नजीर सय्यद वय ३७ वर्षे, धंदा मजूरी रा. शक्करभाई मोहल्ला, लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ५) आसिफ पिता नजीर सय्यद वय ३५ वर्षे, धंदा मजूरी रा. शक्करभाई मोहल्ला, लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद ६) कदिर पिता नजीर सय्यद वय ३३ वर्षे, धंदा मजूरी रा. शक्करभाई मोहल्ला, लासुर स्टेशन, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद

// विरूध्द //

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारसप्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ६ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ हे अर्जदार क्रं. २ ते ६ यांचे वडील असून अर्जदार क्रं. २ ते ६ हे आपसात सख्खे भाऊ आहे. अर्जदार क्रं. १ ची पत्नी व अर्जदार क्रं. २ ते ६ यांची आई नामे अमिनाबी नजीर सय्यद दिनांक १७/०८/२०२३ रोजी मौजे शक्करभाई मोहल्ला, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेली आहे. मयत अमिनावी नजीर सय्यद यांना अर्जदार क्रं. १ पती व अर्जदार क्रं. २ ते ६ मुले या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्र. १ ते ६ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत अमिनाबी नजीर सय्यद यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय व इतर कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक ०८/०५/२०२५ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

आदेशावरून
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर गंगापुर.

## अग्रलेख...

# प्रहाराय सन्निहितः...

गेल्या जवळपास १५ दिवसांपासून देशात उफाळलेल्या संतापाच्या लाटा अखेर बुधवारच्या निर्णायक कारवाईमुळे आश्वस्ततेच्या किनाऱ्यावर येऊन स्वस्थ झाल्या आहेत. बुधवारची पहाट उजाडण्याआधीच केवळ २५ मिनिटांत आपल्या समंजस राजनीतीचे आणि आंतरराष्ट्रीय संकेतांचा आदर करण्याच्या भावनेचे दर्शन घडवून भारताने केवळ पाकिस्तानलाच नव्हे, तर उभ्या जगाला आपल्या सामर्थ्याची जाणीव करून दिली आहे. २२ एप्रिलला काश्मीरच्या पहलगाम येथे निरपराध पर्यटकांवर हल्ला करून त्यांची गोळ्या घालून हत्या करण्याचे उद्दाम धाडस अतिरेक्यांनी केले, तेव्हाच पाकिस्तानच्या पापाचा घडा भरल्याचे स्पष्ट झाले होते. भारताच्या समाजजीवनाला एक संस्कृती, परंपरा आहे आणि त्यामध्ये स्त्रीचे सौभाग्यलेणे असलेल्या, तिच्या भाळावरच्या कुंकवाचे स्थान सर्वोच्च आदराचे आहे. पाकिस्तानातील धर्मांध अतिरेक्यांच्या म्होरक्यांनी पढवून भारतात पाठविलेल्या कट्टरपंथी अतिरेक्यांनी भारतीय महिलांच्या कपाळावरचे कुंकूच पुसून टाकण्याचा उद्दामपणा केला. त्याचे स्पष्ट प्रत्यंतर पुढे १३ दिवसांतच पाकिस्तानला आले आहे. पाकिस्तानच्या हद्दीत घुसून त्यांना काही कळण्याच्या आत व कोणतीही कृती करण्याची वा बचावाची संधी न देता भारताच्या लष्कराने अभूतपूर्व युद्धनीतीचे दर्शन घडविले आहे. 'प्रहाराय सन्निहितः जयाय प्रशिक्षितः' ही आपल्या संस्कृतीने आखून दिलेली युद्धनीती आहे. कुरुक्षेत्राच्या रणभूमीवर काहीशा द्विधा मनःस्थितीमुळे गलितगात्र होऊन माघारीच्या विचारांनी ग्रासलेल्या अर्जुनास युद्धासाठी प्रवृत्त करताना, रणांगणात त्याच्या रथाचे सारथ्य करणाऱ्या भगवान श्रीकृष्णाने उपदेशातून दिलेला हा संदेश केवळ महाभारतातील त्या एका युद्धापुरता सीमित नव्हता, तर तो समाजमनावरचा शाश्वत संस्कार होता. त्यामुळे पुढे युगे लोटून गेल्यानंतरही आपल्या संस्कृतीने आणि परंपरेने या उपदेशाची पालखी अभिमानाने खांद्यावर मिरविली आणि प्रत्येक पिढीने पुढच्या पिढीच्या खांद्यावर सोपवूनच जगाचा निरोप घेतला आहे. युद्धासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत आणि प्रत्येक युद्धात विजय प्राप्त करणे हेच आमचे अंतिम उद्दिष्ट असेल, ही श्रीकृष्णाची शिकवण केवळ गीतापठनापुरती राहिलेली नाही, तर जेव्हा जेव्हा युद्धाचा प्रसंग लादला गेला, तेव्हा तेव्हा ती आचरणात आणली गेलेली आहे. बुधवारचा दिवस उजाडण्याआधी पाकिस्तानातील दहशतवादी अड्ड्यांवर उडालेला हलकल्लोळ आणि अनपेक्षिताच्या धक्क्याने पाकिस्तानात माजलेला भयगंड पाहता, भारतातील जनतेस अपेक्षित असलेल्या विजयाचा आनंद उत्स्फूर्तपणे व्यक्त होणे गैर नव्हतेच. त्यातही अतिरेक्यांनी भ्याड हल्ल्यात ज्या महिलांचे कुंकू पुसण्याचे बेमुर्वत धाडस केले, त्या प्रत्येक धाडसाच्या पापाचे माप त्यांच्या पदरात घालण्याची कृतीदेखील अनपेक्षित नव्हतीच. या प्रत्येक हल्ल्यास आणि अशा कृतीला प्रोत्साहन देणाऱ्या प्रत्येक विघातक शक्तीला धडा शिकविण्याची प्रतिज्ञा पंतप्रधानांनी केल्यानंतर देशातील प्रत्येक राष्ट्रप्रेमी नागरिकाच्या मनात प्रतिशोधाच्या भावना उफाळून येणे साहजिक होते. 'ऑपरेशन सिंदूर' या नावाने भारतीय सेना दलाने आखलेल्या या ऐतिहासिक मोहिमेतून, पहलगामच्या संकटामुळे पुसल्या गेलेल्या प्रत्येक सिंदुराचा हिशेब पूर्ण झाल्याचा उन्माद देशात उफाळला, तेव्हा या संयमाची संयत जाणीव करून देण्याचे समंजस पाऊल केंद्र सरकारने कोणताही गाजावाजा न करता उचलले. युद्धज्वराच्या उन्मादाचे भरते पुन्हा जागेवर आणण्याच्या दृष्टीने बुधवारी भारतीय संरक्षण दलाने आणि सरकारने केलेल्या कृतीची दखल घ्यायलाच हवी. कारण देशातील अनेकांच्या भावनांचा अतिरेक होऊन देशात सामाजिक विद्वेष उफाळून उद्रेक होणार नाही किंवा सामाजिक भेदभावाच्या भिंती उभ्या राहणार नाही, याची खबरदारी घेणे सरकारच्या व संरक्षण खात्याच्या त्या कृतीमुळेच साध्य झाले आहे.

सैन्य दलाने पाकिस्तानात घुसून तेथे असलेल्या अतिरेक्यांच्या अड्ड्यांना लक्ष्य केले. सर्वसामान्य नागरिकांस या कारवाईची कोणतीही झळ पोहोचणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेत भर नागरी वस्तीतील अतिरेकी अड्डे उद्ध्वस्त करणे हे सोपे आव्हान नव्हते. त्यामुळेच अत्यंत अभ्यासपूर्वक आखणी करून सीमेपलीकडच्या केवळ अतिरेक्याचा तळ असलेल्या जागांचा ठावठिकाणा अचूक शोधून काढणे व नेमके लक्ष्य साधून त्यावर अचूक मारा करणे हे काहीसे असाध्य आणि सामान्यांच्या कल्पनेसही शिवणार नाही, असे काम सैन्य दलाने अर्ध्या तासाहूनही कमी वेळात पूर्ण केले. पहलगामच्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारतीय सैन्यास कारवाईची संपूर्ण मुभा देताना मोदी सरकारच्या ज्या काही अपेक्षा होत्या, त्यांची एवढ्या प्रगाढ आत्मविश्वासाने यशस्वी पूर्तता करण्याच्या सैना दलांच्या या कार्यवाहीबद्दल स्वतः पंतप्रधानांनीच त्यांचे कौतुक केलेच, पण कारवाईच्या यशाचे संपूर्ण श्रेयदेखील सैन्य दलांच्या पराक्रमास बहाल करून संयमशील नेतृत्व गुणाचे दर्शनही घडविले. बुधवारच्या दिवसभर देशात युद्धज्वराचा उद्रेक माजला होता, तसे काही विघ्नसंतोषींना मोदीद्वेषाच्या ज्वराचीही बाधा झाल्याचे दिसू लागले होते. अर्थात, मोदीद्वेषाच्या ज्वराचे विषाणू राजकीय विरोधातूनच फोफावत असल्याने अशा आव्हानात्मक स्थितीत त्यांना आवर घालण्याचा विवेक दाखविणे शक्यदेखील होते; पण तसे झाले नाही. भारतीय लष्कराचे मोकळ्या मनाने अभिनंदन करताना, मोदी यांनी स्वतःच न घेतलेल्या श्रेयाचे माप त्यांच्या पदरात पडू नये यासाठी काही विरोधी नेत्यांची अहमहमिका सुरूदेखील झाली होती. अर्थात, अशा प्रसंगी नेतृत्वाच्या संयमाचीही कसोटी लागत असते. देशातील द्वेषाच्या संकुचित भावनांकडे फारसे लक्ष न देता, ऑपरेशन सिंदूरच्या कारवाईनंतर जगातील प्रमुख राष्ट्रांना भारताच्या या कृतीचे कारण पटवून देण्याची तत्परता दाखवत असतानाच लष्कराच्या वतीने देशातील माध्यमांच्या मंचावरही कारवाईमागची भूमिका स्पष्ट करणारी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली, तेव्हाही छिद्रान्वेषी द्वेषबुद्धीने पछाडलेल्या काहींनी त्यातूनही सामाजिक भेदाचे मुळातच नसलेले धागे उसविण्यास सुरुवात केली होती. या पत्रकार परिषदेत भारतीय सेनादलाच्या दोघा महिला अधिकाऱ्यांनी देशाची कारवाईमागील भूमिका स्पष्ट केली होती. भारताची ही कारवाई लक्ष्यकेंद्रित, प्रतिक्रियात्मक आणि सुनियोजित असल्याचे या पत्रकार परिषदेतही स्पष्ट करण्यात आले होते आणि हे पाकिस्तानवरील हल्ला किंवा पाक लष्कराशी छेडलेले युद्ध नसून भारतात अस्थिरता माजविणाऱ्या दहशतवादी कारवायांच्या बंदोबस्ताकरिता उचललेले पाऊल होते, हेही भारताने स्पष्ट केले होते. यावर पाकिस्तानकडून कोणत्याही स्वरूपात हल्ला किंवा लष्करी कारवाई झाली तर त्यास मात्र योग्य ते प्रत्युत्तर दिले जाईल, असा इशाराही भारताने दिला होता. त्यानंतरही पाकिस्तानच्या सैन्याकडून भारताच्या उत्तर व पश्चिमेकडील सीमेवर अवंतीपुरा, श्रीनगर, जम्मू, पठाणकोट, अमृतसर, जालंधर, लुधियाणा, आदमपूर, भटिंडा, चंडीगढ, भुज आदी भागात ड्रोन व मिसाईलचे हल्ले झाल्याने गुरुवारी सकाळी भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या संरक्षण यंत्रणांचा भेद करून जशास तसे उत्तर दिले आहे. भारतीय सैन्याने लाहोरचा लष्करी तळच उद्ध्वस्त केल्यामुळे भयाने पछाडलेल्या पाकिस्तानच्या उतावळ्या कारवायांत १६ निरपराध भारतीयांचा मृत्यू ओढवला. त्यामध्ये तीन महिला व पाच बालकांचा समावेश आहे. पाकिस्तानच्या या युद्धखोर कुरापतीमुळे आता 'ऑपरेशन सिंदूर' या कारवाईचा पुढचा टप्पा सुरू होणे अपरिहार्य दिसते. धडा शिकविण्यासाठी युद्ध हाच निर्णायक पर्याय असेल, तर आता त्याची अपरिहार्यता लक्षात घेऊन भारताच्या प्रत्येक नागरिकाने संयम, समंजसपणा दाखवून विद्वेषाचे राजकारण बाजूला ठेवावयास हवे. केंद्र सरकारने गुरुवारी बोलाविलेल्या सर्वपक्षीय बैठकीत विरोधी पक्षांनी समंजसपणाचे दर्शन घडविले आहे. आता समाजाने ही जबाबदारी पार पाडावयास हवी. सामाजिक सौहार्द आणि ऐक्य ही देशाची सर्वात मोठी शक्ती आहे, याची पंतप्रधान नरेंद्र मोदी वारंवार जाणीव करून देत असतात. भारतीय जनतेची ही शक्ती पुढच्या संघर्षाचे मोठे पाठबळ ठरणार आहे. कारण दहशतवादी हल्लेखोरांनी निरपराध भारतीय नागरिकांना गोळ्या घालण्याआधी त्यांचा धर्म कोणता ते विचारले होते. आता भारतीयांचा धर्म दाखवून देण्याची वेळ समोर येऊन उभी राहिली आहे.

## जीवन जिज्ञासा

# महाभारत ते भारत (१८)

प्राचार्य प्र. श्री. डोरले

महाभारत हे महाकाव्य महर्षी व्यासांनी ब्रह्मदेवाच्या विशेष आग्रहाने रचिले, अशी पारंपरिक श्रद्धा आहे. तोच प्रकार महर्षी वाल्मीकिंच्या रामायणाबाबतही घडला आहे, असे सांगितले जाते. वरील दोन्ही ग्रंथात भारतीय जीवन पद्धतीचाच नव्हे, तर ब्रह्मदेवाने निर्माण केलेल्या समग्र सृष्टीचा, त्यात विकसित झालेल्या 'मानव' या घटकाचा, त्याच्या जीवनाचा इतक्या सूक्ष्मतम स्तरावर आणि विविधांगांनी विचार झाला आहे की, ते वाचल्यावर, त्यावर विचार आणि मनन केल्यावर मनात 'आश्चर्य भावा'व्यतिरिक्त दुसरा कोणताच भाव निर्माण होत नाही. वरील दोन्ही ग्रंथ हे अतींद्रिय विज्ञानातून, म्हणजे ऋतंभरा प्रज्ञेतून निर्माण झाले. वेदकाळापासून 'ऋत' आणि 'सत्य' या दोन ज्ञानशाखा अस्तित्वात आहेत. आजच्या परिभाषेत 'ऋत म्हणजे कॉस्मिक लॉज, त्यालाच आपण त्रिकालाबाधित सिद्धांत असे म्हणतो आणि 'सत्यम' म्हणजे अस्तित्वात असलेले हृदयमान असलेले, वस्तुनिष्ठ असलेले अनुभवायला येणारे असे! या दोनही शाखांमधूनच अनादिकाळापासून तत्त्वज्ञान म्हणजे सृष्टीच्या निर्मितीचा शोध घेणे आणि बाह्य सृष्टीचा मुळामध्ये जाऊन तिचा शोध घेणारे विज्ञान (सायन्स) निर्माण झाले. वरील दोनही ग्रंथात परमेश्वराच्या 'त्वं ज्ञानमयो विज्ञानमयोसि' या दोन्हीही स्वरूपाचा महाकवींनी शोध घेतला आहे. त्या दृष्टीने या महाकाव्यांचा सखोल अभ्यास आणि चिंतन होणे आवश्यक आहे. या आधीच्या लेखांमधून महाभारत आणि भारत यांचा परस्परांशी कसा 'जन्य-जनक' संबंध आहे, चक्रवती भरताचे वारसदार म्हणून येथील राहणारा हिंदू समाजच कसा येथील राष्ट्रीय समाज आहे म्हणजे हिंदुत्व हेच येथील राष्ट्रीयत्व आहे, याचा शोध घेतला. त्याचबरोबर भारत वर्षाची पहिली फाळणी ही द्वापार युगात झाली. त्यातूनच परिणामतः कुरुक्षेत्रावरील भीषण असे अण्वस्त्रयुक्त महायुद्ध घडले. त्याचे कारण दुसऱ्याचे राज्य गिळंकृत करण्यासाठी साम, दाम, दंड, कुटिल कारवाया आणि आत्यंतिक द्वेषमूलक व्यवहार करणाऱ्या 'धृतराष्ट्री' मनोवृत्तीमुळे हे महाभारत युद्ध घडले आहे. धृतराष्ट्री मनोवृत्तीचे आधुनिक काळातील प्रतीक म्हणजे पाकिस्तानी वृत्ती. जी हिंदू धर्म, हिंदू समाज, संस्कृती यांचा 'काफर' म्हणून मध्ययुगीन ऐतिहासिक काळापासून दुर्योधनालाही लाजवेल असा तीव्र, जहरी द्वेष करीत आहे, त्याचे प्रत्यंतर पहलगाम येथील यात्रेकरूंवर जो ओळख विचारून, धर्म विचारून गोळ्या झाडून ठार मारण्याचा प्रसंग घडला त्यावरून लक्षात घ्यायला हरकत नाही. त्याचबरोबर



दुर्योधनाला 'सुयोधनं' म्हणण्याचा एकतर्फी सज्जनपणा दाखवून त्या सज्जनपणाला आधुनिक परिभाषेत 'सेक्युलॅरिझम' सर्वधर्मसमभाव- तुमचे-आमचे पूर्वज एकच होते. 'हिंदू-मुस्लिम भाई भाई' वगैरे 'सॉफिस्टेकेटेड' आवरणाने ओंजारून-गोंजारून वास्तवातील कटुसत्य हे कधीही अमृत मधूर होत नसते, हा शत्रू-मित्र विवेक ज्या दिवशी हिंदू समाजाच्या प्रत्येक घटकात खऱ्या अर्थाने रुजेल, भिनेल तो खऱ्या अर्थाने हिंदुत्वाच्या जागृतीचा खरा क्षण वा प्रारंभ बिंदू ठरेल.

महाभारतात 'कृष्ण शिष्टाई' असफल झाल्यानंतरचा विदूर आणि भगवान श्रीकृष्ण यांच्यातील संवाद महर्षी व्यासांनी दिला आहे. विदूर प्रारंभापासूनच धृतराष्ट्री वृत्तीला विरोध करणारा होता (जसे आधुनिक फाळणीच्या विरोधात डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, प. पू. श्री गोळवलकर गुरुजी, स्वातंत्र्यवीर सावरकर, डॉ. मुंजे ही मंडळी होती; तरी फाळणी झाली.) त्या संवादात श्रीकृष्ण विदुराला म्हणतात- ''हे महात्मन्! जे घडायचे असते ते घडतच असते. कारण 'नियतीने' ते ठरविलेच असते. कालपुरुषाला हाताशी धरून ती त्याचा परिणाम घडवून आणते. तसे धृतराष्ट्र आणि दुर्योधन यांचे निमित्त करून या आसुरी संपदेच्या, धर्मद्रोही, लोभी, कामांध सत्तापिपासू, स्त्रीभक्षी, पापी नराधमांच्या रक्ताने ही धरा न्हाऊन निघण्याचा क्षण आला आहे असे समज आणि निवांतपणे जे होईल ते पहा. हे विदुरा! हा कुरुवंशीयांचा संघर्ष नसून 'धर्म आणि अधर्म' असा लढा आहे. पांडवांच्या बाजूने धर्म आहे म्हणून मी पांडवांकडून आहे असे समज.'' (कृष्ण-शिष्टाई उद्योगपर्व)

वरील संवादाचे चिंतन केले तर असे जाणवू लागते की, भगवान श्रीकृष्णांना आधुनिक 'भारता'लाही हाच संदेश द्यायचा असेल का? नियतीने, कालपुरुषाने तर हे ठरविले नसेल? कारण महाभारताची रचना काही विशेष उद्देशाने झाली असावी असे वाटते. कारण-

महाभारताची पर्वे १८ आहेत. भगवद्गीतेचे अध्याय १८ आहेत. महाभारतीय युद्ध १८ दिवसच चालले. या युद्धात १८ अक्षौहिणी सैन्याचा सहभाग होता. भगवद्गीतेत अ. १ श्लोक क्र. ४ ते ६ मध्ये पांडवांकडील महत्त्वाच्या वीरांची गणना दिली आहे. तीदेखील १८ च आहे. भीम, अर्जुन, सात्यकि, विराट, द्रुपद, धृष्टकेतू, चेकितान, काशिराज पुरुजित् - कुन्तिभोज, शैव्य, युधामन्यु, उत्तमौजा, सौभद्र, अभिमन्यू आणि द्रौपदीचे पाच पुत्र- असे एकूण १८.

संख्याशास्त्राच्या दृष्टीने १८ ही संख्या वैशिष्ट्यपूर्ण समजली जाते. या शास्त्राप्रमाणे या संख्येचा भाग्यांक वा इन्डेक्स नंबर ९ हा येतो. त्या संबंधात 'लिंडागुडमन' ही भविष्यवेत्ती म्हणते- ''द इन्डेक्स नंबर नाईन इंडिकेटस द कम्प्लिटली चेंज अँड ट्रान्सफर्मेशन ऑफ द सेटल्ड् थिंग्ज'' या संदर्भात विचार केला तर द्विराष्ट्र सिद्धांत मांडून बॅ. जिना यांनी भारताची दुसरी फाळणी करायला भाग पाडले. सन १९४७.

लगेच टोळीवाल्यांच्या आक्रमणाने अर्धा काश्मीर हडपला. नंतर १९६५, १९७१, १९७९ अशी तीन युद्धे भारतावर लादलीत. अनेक दहशतवादी हल्ले मुंबई, दिल्ली-संसद, काश्मीर येथे चालूच आहे. नुकतेच जनरल परवेझ यांनी त्याच 'द्विराष्ट्र' सिद्धांताची मांडणी करून, आतंकवाद्यांना चिथावून हिंदूंचे शिरकाण करण्यासाठी यात्रेकरूंवर हल्ला करायला भाग पाडले. त्याचा परिणाम म्हणून कधी नव्हे तो भारत जागा झालेला दिसतो आहे. प्रतिकार नव्हे तर आक्रमणाची व्यूहरचना करतो आहे. फाळणीचा परिणाम म्हणून कुरुक्षेत्राकडे सैन्याची वाटचाल चालू आहे. महाभारतात म्हटल्याप्रमाणे 'नियतीची, कालपुरुषाची तर ही इच्छा नाही ना?' कारण, सध्याची लोकसभा ही अठरावी लोकसभा आहे.

। कालाय तस्मै नमः ।

९८६०२९६१३१

(लेखक विचारवंत आणि माजी प्राचार्य आहेत)

## वेध

प्रफुल्ल क. व्यास

# काळा धूर, पांढरा धूर!

'आग लागल्याशिवाय धूर निघत नाही' अशी आपल्याकडे गावगाड्यात एक म्हण आहे. मोठं मस्त उदाहरण आहे हे सत्य मांडण्याचं! तसे बघितले तर धुराचा संबंध थेट चुलीसोबत येतो. गॅसच्या जमान्यात आता चुलीवरच्या जेवणाची क्रेझ वाढती आहे. अगदी येथे चुलीवरचे मटण आणि जेवण मिळेल, अशा मोठमोठ्या जाहिराती महामार्गावर वाचायला मिळतात. बऱ्याचदा चुलीवरचे जेवण हवे असते. परंतु, त्या चुलीतला धूर नकोसा होतो! हा धूर डोळ्यातून पाणी काढल्याशिवाय राहत नाही. सिगारेट एक जण पितो आणि त्याचा धूर शेजारी बसलेल्याच्या नाका-तोंडात जातो. सिगारेट ओढणाऱ्याचा शौक होतो आणि शेजारी परेशान! 'हम दोनो' या चित्रपटात महम्मद रफी यांच्या आवाजात देवानंदने 'मै जिंदगी गा साथ निभाता चला गया, हर फिक्र को धुव्वे में उडाता चलाता गया,' हे गाणं म्हटले आहे. चिंता धुरात उडवून दिल्याचे म्हटले आहे. धूर म्हणजे शास्त्रीय भाषेत सांगायचे झाल्यास वस्तू जळताना हवेत निर्माण होणारा सुक्ष्म कण आणि वायूचे मिश्रण. धुराचे मुख्य तीन प्रकार आहेत. सेंद्रिय, रासायनिक आणि वाहनांचा धूर. या धुराचे मनुष्याच्या आरोग्यावर आणि पर्यावरणावरही परिणामी होतात. आता तुम्ही म्हणाल, हा एवढा धूर महिमा मांडण्याचे कारण काय? सध्या भारत-पाकिस्तानात तणावाचे वातावरण आहे. आपल्या भगिनींचे सिंदूर मिटवणाऱ्या पाकाड्या दहशतवाद्यांवर भारताच्या सैनिकांनी अर्ध्या रात्री हल्ला करून त्यांचा धुव्वा उडवून दिला असताना आता पुन्हा हे काय नवीनच! तर, भारतातीलच काही अतिबुद्धिवादी (हिंदूच) जेव्हा हिंदूंना अंधश्रद्धाळू म्हणतात तेव्हा या 'धुरा'ची आठवण होते. असाच एक धूर काल ७ मे रोजी (सोनिया गांधी यांचे माहेर) इटली व्हॅटिकन सिटीमध्ये निघतो आहे. होय! आम्ही तिथी, मुहूर्त, काळ आणि वेळ पाळतो. तुम्ही कितीही अंधश्रद्धा म्हणा, आमची देवावर श्रद्धाच आहे. देशात सध्या धर्मांतरणाचा प्रकार जोरावर आहे. अतिशय गरीब आणि आदिवासींसह अन्य मागास समाजाला त्यांच्या अशिक्षित आणि गरजेचा फायदा घेत त्यांना धर्मांतरण करण्यासाठी प्रलोभन दिले जाते. अशा वेळी 'क्रॉस' पाण्यावर तरंगतो आणि तुमचा देव पाण्यात बुडतो. याचा अर्थ आमचा देव तारतो आणि तुमचा बुडवतो, असे त्यांच्यावर पैशांचा लोभात बिंबवले जाते. आमच्या देशात त्यांच्या नीतिमत्तेचा प्रचंड आदर करणारी एक पिलावळ तयार झाली आहे. तसेही भारतातील हिंदूंवर वा काही विशिष्ट जातींवर गरळ ओकणाऱ्यांना डोक्यावर घेतले जात असताना हेच ख्रिश्चन 'पांढऱ्या आणि काळ्या' धुरात अडकले आहेत. हाच धूर त्यांचा 'धर्मगुरू' झाल्याचे संकेत देतो आणि आपण संकेतांना मागासले म्हणतो. आता जाऊ आपण या धुराच्या कौतुकाकडे. ख्रिश्चन धर्मानुसार विद्यमान धर्मगुरू पोप मरण पावल्यानंतर किंवा त्याने राजीनामा दिल्यानंतरच नवीन पोपची निवड होते. पोप फ्रान्सिस यांचे २१ एप्रिल रोजी निधन झाले. काल ७ मे रोजीपासून व्हॅटिकन सिटीत गुप्त निवड प्रक्रिया सुरू झाली आहे. या निवड प्रक्रियेत धुराचेच फार महत्त्व आहे. पोपच्या निवड प्रक्रियेपूर्वीच निवडणुकीचे स्थळ असलेल्या सिस्टिन चॅपलममध्ये शेगडी बसवली जाते. त्या शेगडीवर एक चिमणी लावली जाते. मतदानाच्या दोन फेऱ्यानंतर मतपत्रिका त्या शेगडीवर जाळल्या जातात. त्या मतपत्रिकांचा धूर चिमणीतून बाहेर पडतो. बाहेर पोपच्या निवडीची वाट पाहत उभ्या असलेल्यांना हा धूर निवड प्रक्रियेचे संकेत देतो. चिमणीतून काळा धूर आला तर कोणताही निर्णय झाला नाही आणि पांढरा धूर आला तर नवीन पोपची निवड होऊन त्याचा स्वीकार झाल्याचे समजले जाते. आम्ही हिंदू देवाधर्माला धूप लावातो, यज्ञ करतो तर त्याला थोतांड म्हटले जाते. जेवणापूर्वी अग्निहोत्र करण्यावरही टीका होतात आणि त्या पांढऱ्यांचा संदेश देवाकडे पोहोचविणाऱ्याची निवड मात्र धुरावरून समजल्या जाते. तो त्यांच्या धर्माचा रिवाज आहे. त्या धर्मानुसार त्यांनी वागलेच पाहिजे. परंतु, आमच्यातील काहींना जेव्हा आम्ही ज्या धर्मात जन्म घेतला त्या धर्मापेक्षा इतर धर्म जेव्हा जवळचा वाटतो तेव्हा पांढरा व काळा धूर आठवून द्यावासा वाटतो. आमच्या धर्मगुरूसाठी मतदान वैगेरे होतच नाही. हिंदूधर्मामध्ये अनेक संप्रदाय आहेत. त्या संप्रदायातील वरिष्ठ आपल्या शिष्यांपैकी एकाची वारसदार म्हणून निवड करतात. जेव्हा शंकराचार्य, रामानुजाचार्य वा त्यांच्या समतुल्य आचार्याचे निधन होते तेव्हा त्यांनी निवड केलेल्या शिष्याला त्यांच्या गादीवर बसवले जाते तर ख्रिश्चन धर्मात सामान्यांचा संदेश देवाकडे घेऊन जाणाऱ्या पोपची निवड केली जाते. हाच मोठा फरक आहे हिंदू आणि ख्रिचन धर्मामध्ये! धर्म कोणताच वाईट नाही. दुसऱ्या धर्माला सहज वाईट म्हणण्याची आपली संस्कृती नाही. परंतु, काहींनी आपल्याच संस्कृतीला नावं ठेवण्याचा ठेका घेतल्यागत गरळ ओकतात तेव्हा पुन्हा त्यांचा 'तरंगता क्रॉस' आणि निघणारा पांढरा 'धूर' सांगावासा वाटतो. आम्ही अंधश्रद्धाळू आणि ते विज्ञानवादी ठरवणाऱ्यांनो वाईट वाटून घेऊ नका. पण, संस्कार, संस्कृती आणि सभ्यतेवर चालत आलेला परंपरागत हिंदू धर्माचा गुरू धुरावरून समजत नाही तर त्याच्या सिद्धतेवरून समजल्या जातो. बुधवारी धूर काळा निघाला म्हणजे धर्मगुरू निवडलाच गेला नव्हता... पांढऱ्या धुराची वाट पाहत राजेहो...!

९८८१९०३७६५


## दखल

# आव्हान महापालिका निवडणुकांचे

मोरेश्वर बडगे

जवळपास दोन ते पाच वर्षांपासून रखडलेल्या राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यात घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकार आणि निवडणूक आयोगाला दिले आहेत. या आदेशाने निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे. नोकरशाहीच्या पंज्यातून सुटका होत आहे. एखाददुसऱ्या निवडणुकीचा हा प्रश्न नव्हता. राज्यातील तब्बल २९ महापालिका, तेवढ्याच जिल्हा परिषदा, २५७ नगर परिषदा आणि पंचायत समित्या इथल्या निवडणूक रखडल्या आहेत. एक-दोन महिने नव्हे तर काही वर्षांपासून हे सुरू होते. सुरुवातीला करूना आणि पुढे वेगवेगळ्या कारणाने न्यायालयात गेलेले मामले निवडणुका लांबवत गेले. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीनंतर सत्ताबदल झाला. महाआघाडीचे सरकार आले. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री बनले. त्याच काळात कोरोना संकट आले. निवडणुका साऱ्यांनाच हव्या आहेत. मात्र त्या कशा असाव्यात यावरून मतभेद आहेत. त्यातून ओबीसी आरक्षणाचा पेच आला. प्रभाग रचना कशी असावी हाही विषय आला. उद्धव सरकार अडीच वर्षे टिकले. विविध कारणांमुळे या निवडणुका लांबत गेल्या. आताही सर्वोच्च न्यायालयाचा असा आदेश येईल, याची कोणीही कल्पना केली नसेल. पुढची तारीख पडेल, पुढे उन्हाळ्याची सुटी आहे. त्यामुळे निवडणुका पुढल्या वर्षी जातील असे गृहीत धरूनच सारे राजकीय नेते चालले होते. या साऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाने आश्चर्याचा झटकाच दिला, असे म्हटले पाहिजे. ओबीसी आरक्षणाचा मोठा गुंतागुंतीचा विषय सर्वोच्च न्यायालयाने एक झटक्यात मार्गी लावला. न्यायालयाने बांठिया आयोगाचा अहवाल बाजूला ठेवला. २०२२ च्या पूर्वी ओबीसींना जेवढे आरक्षण देण्यात येत होते ते कायम ठेवून निवडणुका घ्या, असे कोर्टाने म्हटले आहे. मात्र या संदर्भातील अन्य याचिकांवरील निकाल या निवडणुकांना बांधील असेल, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

सर्वोच्च न्यायालयाने चार महिन्यात निवडणुका घ्यायला सांगितले असले, तरी ते वाटते तेवढे सोपे नाही. न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोगापुढे अनेक प्रश्न उभे राहणार आहेत. प्रभाग रचना कशी ठेवायची? हा नाजूक विषय आहे. प्रभाग रचनेबाबत न्यायालयाच्या आदेशात स्पष्टता नाही. २०१७ नंतर प्रथमच निवडणुका होत आहेत. या पाच वर्षांत लोकसंख्या खूप वाढली आहे. या वाढलेल्या लोकसंख्येचे काय? त्यांना सोबत घ्यायचे तर तयारीला वेळ लागू शकतो. ठाकरे सरकारच्या



निर्णयानुसार वाढीव प्रभाग संख्येआधारे प्रभाग रचना तयार करण्यात आली आहे. शिंदे-फडणवीस सरकारच्या निर्णयानुसार जुन्या पद्धतीने प्रभागरचना करायची असल्यास काही महिन्यांचा अवधी लागेल. महाआघाडी सरकारने वाढवलेली प्रभाग संख्या शिंदे सरकारने पूर्ववत केली होती. या निर्णयालाही न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. प्रभाग रचनेचे अधिकार कोणाचे? यावरूनही वाद आहेच. एकूणच सारा संशयकल्लोळ आहे. मात्र अडचण असेल तर माझ्याकडे येऊ शकता, असे न्यायालयाने आधीच सांगून टाकले आहे. तुम्हाला सांगतो, निवडणूक चार महिन्यात घेणे अवघड आहे. निवडणूक आयोगाला न्यायालयाकडे मुदतवाढ मागावी लागेल. खूप सारे तांत्रिक अडसर आहेत. मात्र निवडणुका झाल्या पाहिजेत या मुद्यावर न्यायालय आग्रही आहे. पाच-पाच वर्षे निवडणुका नव्हत्या. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नोकरशाहीचे राज्य होते. कोर्टाने निवडणुका घ्यायला सांगितले त्यामागे लोकप्रतिनिधींचे राज्य आणण्याचा मुख्य विचार असावा असे दिसते. न्यायालय थोडीफार मुदतवाढ देऊ शकते. पावसाळ्यानंतरच निवडणुका होतील. गणपती उठल्यानंतरच निवडणुका होऊ शकतात. दसरा-दिवाळीनंतर निवडणुका घ्या, असेही काही जणांचे म्हणणे आहे. एकूणच येणारे दिवस सणासुदीचे आहेत. त्यातला एखादा मुहूर्त आयोगाला पकडावा लागेल. मात्र ही सर्कस लहान नाही. 'एक निवडणूक, दहा भानगडी' आहे. महापालिकांपासून तो जिल्हा परिषद, नगरपालिका आणि ग्रामपंचायतीपर्यंत निवडणुका करायच्या आहेत. या साऱ्या निवडणुका एकाच दिवशी घेता येणे शक्य नाही. न्यायालय किती मुदतवाढ देतो ते पाहायचे. सध्या पाकिस्तान सीमेवर तणाव आहे. आपण युद्धपूर्व परिस्थितीतून जात आहोत. तणाव वाढला तर निवडणुका बेमुदत लांबू शकतात. या नव्या मुद्यावर लोकांनी आव्हान दिले तर न्यायालय काय भूमिका घेते, तेही पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. १५ मे पासून नवे सरन्यायाधीश भूषण गावी सरन्यायाधीशाची सूत्रे घेत आहेत. ते या घडामोडींकडे कसे पाहतात त्याचीही उत्सुकता असणार आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पृष्ठभूमीवर महापालिका निवडणुका आल्या आहेत. एक प्रकारच्या या मिनी-विधानसभा निवडणुकाच आहेत. दोन्ही निवडणुकीत एकदम वेगवेगळे निकाल लोकांनी दिले. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकांचा काय मूड राहील, याचे सर्वच राजकीय पक्षांना टेन्शन आहे. इथे स्थानिक मुद्दे महत्त्वाचे ठरतात. मात्र, यावेळी राजकीय समीकरणं बदलली आहेत. उद्धव यांना हिंदुत्व सोडल्याची शिक्षा द्यायला मुंबईचा मतदार मैदानात उतरलेला दिसेल. अपवाद सोडले तर महायुती या निवडणुका एकत्र लढेल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लगेच सांगून टाकले. यावरून मुख्यमंत्र्यांचा जबरदस्त आत्मविश्वास दिसून पडतो. कुठल्याही परिस्थितीत यावेळी मुंबई महापालिका उद्धव ठाकरे यांच्या हातून हिसकायची हे भाजपाचे टार्गेट आहे. भाजपाशी पाच वर्षांपूर्वी केलेल्या दगाबाजीचा बदला घेताना फडणवीस दिसतील. त्यामुळे मुंबईची निवडणूक अतिशय चुरशीची राहणार आहे. 'मी राहीन किंवा तू राहशील' असे आव्हान उद्धव ठाकरे यांनी विधानसभा निवडणुकीत फडणवीस यांना दिले होते. तिथे तर धुव्वा उडाला. उरलेसुरले उद्धव या निवडणुकीत मुंबईच्या राजकारणातून फेकले गेलेले दिसतील. महाआघाडी केव्हाच मोडल्यात जमा आहे. मुंबईत घटस्फोटाचे कागद लिहिले जातील. काँग्रेस रिकामी झालेली दिसेल. शरद पवारांची राष्ट्रवादी पेन्शनीत गेलेली दिसेल. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येत असल्याची चर्चा नेहमीसाठी थांबलेली दिसेल. मराठी आणि महाराष्ट्राच्या हितासाठी आपण एकत्र यायला तयार असल्याची तयारी राज ठाकरे यांनी एका पॉडकास्टमध्ये दाखवली होती. राज यांच्या या टाळीला उद्धव ठाकरे यांनी सशर्त हाळी दिली. भाजपा आणि शिंदे सेनेशी संबंध तोडावे लागतील, ही उद्धव यांची अट राज ठाकरे कबूल करणे कदापि शक्य नाही. उद्धव यांनाही ते ठाऊक आहे. त्यामुळेच त्यांनी तशी अट टाकली. तुम्ही लिहून घ्या, दोन्ही भावांचे मनोमिलन या जन्मी शक्य नाही. त्यामुळे मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे अशा काही महत्त्वाच्या महापालिका निवडणुकीत चौरंगी-पंचरंगी लढती होतील. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी ही दुसरी अग्निपरीक्षा असेल. शिवसेनेच्या फुटीनंतर आपली शिवसेना हीच खरी शिवसेना आहे हे शिंदे यांना पुन्हा एकदा दाखवून द्यावे लागेल. आपण नाराज नाही हेही निकालातून सांगावे लागेल.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### भारताचे चोख प्रत्युत्तर...

'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी करून भारतीय सैन्याने पहलगाम येथे मरण पावलेल्या २६ पर्यटकांच्या हत्येचा बदला घेतला आहे. भारतीय सैन्याची ही कामगिरी अभिमानास्पद आहे. पाकिस्तानला चोख प्रत्युत्तर देणाऱ्या भारतीय सैन्याच्या या गौरवपूर्ण कामगिरीने १४० कोटी भारतीयांची मान अभिमानाने उंचावली आहे. भारतीय सैन्याच्या या कामगिरीचा देशवासीयांना सार्थ अभिमान असून १४० कोटी भारतीय भारतीय सैन्य दलापुढे नतमस्तक आहेत. जो भारताकडे तिरक्या नजरेने पाहिल त्याला भारत घरात घुसून मारेल, असा इशाराच भारताने या मोहिमेद्वारे पाकिस्तानला दिला आहे. भारताच्या सार्वभौमत्वाला आव्हान देणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ॲक्शनला री-ॲक्शन मिळणारच. हा भारत २०२५ चा भारत आहे, हे भारताने पाकिस्तानला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. ही मोहीम यशस्वी करून भारतीय सैन्य दलाने आपले सामर्थ्य जगाला दाखवून दिले आहे. अर्थात भारताने व्याप्त काश्मीरवर केलेला हा पहिला हवाई हल्ला नाही. या आधी २०१६ आणि २०१९ साली भारताने असाच हवाई हल्ला करून पाकिस्तानला इशारा दिला होता. मात्र दोनदा हवाई हल्ले झाल्यानंतरदेखील पाकिस्तानची खोड मोडली नाही. पाकिस्तानने दहशतवाद्यांना आर्थिक आणि लष्करी मदत करणे चालूच ठेवले; त्याचे परिणाम पाकिस्तानला भोगावे लागले. आता तरी पाकिस्तानने शहाणे व्हावे व दहशतवाद्यांना केली जाणारी लष्करी व आर्थिक मदत थांबवावी नाही तर भारत यापेक्षाही मोठी कारवाई करेल. ऑपरेशन सिंदुर यशस्वी करणाऱ्या भारताच्या सैन्यदलाला सॅल्युट! जयहिंद !!

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

● ● ● ●

## वाचक पत्रे

### ईपीएस-९५ पेन्शनर्सच्या भावनांची थट्टा

ईपीएस-९५ पेन्शनर्स त्यांना मिळणाऱ्या तुटपुंज्या पेन्शनबद्दल आपली व्यथा विविध स्तरावर, अगदी केंद्रातील सत्ताधारी सरकार दरबारी मांडून थकली. नुसत्या आश्वासनाव्यतिरिक्त काहीच हाती लागले नाही. ना महागाई भत्ता, ना वैद्यकीय सवलत, ना पेन्शनमध्ये वार्षिक वृद्धी अशा विविध विवंचना सहन करीत हे पेन्शनर्स हालअपेष्टा झेलत आपले जीवन निर्वाहन करीत आहे. परंतु सोशल मीडियाचे यूट्यूब चॅनल मागील काही महिन्यांपासून या ईपीएस-९५ पेन्शनर्सना खोटी आशा दाखवत वाढीव पेन्शन ती देखील कधी पाच हजार, कधी साडेसात हजार, महागाई भत्ता, वैद्यकीय सवलत हे सर्व लवकरच सरकारद्वारे देण्यात येणार असल्याच्या छोट्या क्लिप्स दाखवत दिशाभूल करीत आहे. बरेचदा तर खुद्द वित्तमंत्री निर्मला सीतारामन व पंतप्रधानांचे छायाचित्र सोबत दाखवून जणू काही त्यांनी हा निर्णय घेतलाच आहे, हे भासवण्यात येते. वास्तविक या अशा खोट्या बातम्या म्हणा किंवा आश्वासन म्हणा, वाचून ईपीएस-९५ पेन्शनधारक लगेच उत्साहित व आनंदी होतात, परंतु सत्य परिस्थितीत लक्षात येताच त्यांचा विरस होतो व त्यांची कशी क्रूर थट्टा करण्यात येत आहे, हे ध्यानात येताच हिरमुसले होतात. ईपीएस-९५ पेन्शनर्स आधीच दुखावले असल्यामुळे त्यांच्या भावनांची क्रूर थट्टा बंद झालीच पाहिजे.

**राजीव दारव्हेकर**/९०९६३२२२००

● ● ● ●

### हिंदूसूर्य महाराणा प्रताप

महाराणा प्रतापसिंहांच्या तेजाने केवळ राजपुतांनाच नव्हे, तर सारा भारत देश असा काही तेजाळला आहे की, राणा प्रतापसिंहांचे नाव आजही संपूर्ण भारतात पूज्य मानले जाते. राजस्थानच्या वीरभूमीत शिसोदिया कुलातील मेवाडचे राजा उदयसिंग यांना ९ मे १५४० रोजी पुत्रप्राप्ती झाली; तेच मेवाडचे मेरुमणी महाराणा प्रताप सिंह होय. याच मेवाडच्या सिंहाने मेवाड आणि राजपुताना यांच्या स्वातंत्र्यासाठी अकबरासारख्या बलाढ्य बादशहाशी २५ वर्षे लढा दिला. या लढ्यात त्यांना पत्नीला बरोबर घेऊन मुलाबाळांसह जंगलात भटकावे लागले, तहान-भूक विसरावी लागली. मेवाडचे स्वातंत्र्य टिकवण्यासाठी त्यांनी केलेल्या संघर्षाला इतिहासात तोड नाही. राजस्थानचे सारे राजमुकुट आपल्या चरणी वाकले, परंतु अजून मेवाडचा राणा प्रताप आपल्याला शरण येत नाही, या गोष्टीचे अकबराला विलक्षण वैषम्य वाटत होते. त्याने इतर राजपूत सरदारांद्वारे त्यासाठी खूप प्रयत्न केले, परंतु राणा प्रताप यांनी कोणतीही अपमानकारक तडजोड करण्याचे नाकारले, त्यामुळे लढाई अपरिहार्य ठरली. अकबराच्या आक्रमणास तोंड देण्यासाठी राणा प्रताप सिद्ध झाले. स्वाभिमानशून्य मानसिंगाच्या पंक्तीला राणाप्रताप बसले नाहीत. या अपमानाने त्याचे मन सुडाच्या भावनेने भरून गेले. संतापलेला मानसिंगाने नंतर मोठे सैन्य घेऊन अरवलीच्या पर्वतात येऊन रणावर हल्ला केला. हल्दीघाट येथे दोघांमध्ये घनघोर लढाई झाली. राणांचे सैनिक जीवावर उदार होऊन लढले पण मुघलांचे सैन्य अफाट होते. अखेर राणा प्रताप आपल्या चेतक घोड्यावर स्वार होऊन चपळाईने तेथून बाहेर पडले. चेतक घोड्याला शेकडो जखमा झाल्या होत्या. महाराणांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात शत्रू समोर आपला स्वाभिमान निलाम न करता लढाईचा मार्ग पत्करला आणि आपल्या मातृभूमीचे रक्षण केले. भारताच्या इतिहासात राम, कृष्ण व शिवाजी यांच्याप्रमाणेच महाराणा प्रतापांचे नावही अजरामर झाले आहे.

**पंकज वसंत पाटील**/९८५०४३०५७९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# जिल्हा वार्षिक योजनेची कामे तत्काळ पूर्ण करावीत- जिल्हाधिकारी




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मे**

जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गतची प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज दिले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा वार्षिक योजनेचा आढावा घेण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, जिल्हा नियोजन अधिकारी ग. गो. चितळे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, केशव गड्डापोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सन २०२३-२४ मधील दायित्वाची कामे वेळेत पूर्ण होणे आवश्यक आहे. दायित्वाची रक्कम खर्च केलेल्या कामाची माहिती सर्व विभागांनी सोमवारपर्यंत सादर करावी. वेळेत काम पूर्ण न करणा-या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकावे. दायित्वाची रक्कम खर्च न केलेल्या विभाग प्रमुखावर शिस्तभंगाची कार्यवाही करावी. तसेच सन २०२५-२६ पर्यंत संपणाऱ्या कामाची सद्यस्थितीची माहिती देऊनच निधीची मागणी करावी. जिल्ह्यातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी कोल्हापुरी पध्दतीचे बंधारे (केटीवेअर) ची कामे घ्यावीत. पटसंख्या जास्त व मोठे मैदान उपलब्ध असलेल्या जिल्हा परिषद शाळेसाठी क्रीडा साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी प्रस्ताव सादर करावेत, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

तसेच सर्व कार्यालय प्रमुखांनी जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत सन २०२४-२०२५ साठी वितरीत केलेल्या निधीतील प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करोवत. तसेच केलेल्या कामाचा ताळमेळ तात्काळ पूर्ण करुन उपयोगिता प्रमाणपत्रासह अहवाल सादर करावा. एकमेकांशी समन्वय ठेवून निधी खर्च करण्याबाबत कार्यवाही करावी व त्याचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

तसेच सन २०२५-२६ या वर्षात जिल्हा विकास आराखड्यावर जिल्हा वार्षिक योजनेचा २५ टक्के निधी खर्च करण्याच्या सूचना आहेत. त्यानुसार सर्व यंत्रणांनी जिल्हा विकास आराखड्यातील कामाचे प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावेत, अशा सूचनाही जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी यावेळी दिल्या. या बैठकीस आरोग्य विभाग, महावितरण विभाग, शालेय शिक्षण विभाग, जलसंधारण, पाणीपुरवठा, कृषी, बांधकाम, पशुसवर्धन, महिला व बालविकास यासह विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.

# शिक्षक अभियोग्यता परीक्षेसाठी १४ मे पर्यंत मुदतवाढ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मे**

राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्था व खाजगी व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये पवित्र व संगणकीय प्रणालीद्वारे शिक्षक भरती करीता शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी (ढखढ) २०२५ या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने आयोजन करण्यात येत आहेत. परीक्षेबाबतची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर दिनांक २५ एप्रिल, २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. या परीक्षेचे ऑनलाईन आवेदनपत्र सादर करण्याची मुदत दि. १० मे, २०२५ ऐवजी दि. १४ मे, २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. तसेच ऑनलाईन आवेदनशुल्क भरण्यासाठी दि. १४ मे, २०२५ रोजी २३.५९ मि. पर्यंत मुदत राहील.

दि. २ मे, २०२५ च्या शासन शुध्दीपत्रकानुसार शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्यानंतर व्यावसायिक अर्हता अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्रात प्रविष्ठ असणारे अथवा शेवटच्या सत्राच्या अंतिम परीक्षेस प्रविष्ठ असणारे उमेदवार देखील शिक्षक अभियोग्यता व बुद्धीमत्ता चाचणी परीक्षेस प्रविष्ट होण्यास पात्र राहतील. मात्र दि. ५ मे, २०२५ पूर्वी आवेदनपत्र भरलेल्या उमेदवारांना सुधारित तरतुदीचा लाभ घ्यावयाचा असल्यास त्यांनी पुन:श्च ऑनलाईन आवेदनपत्र भरावे. पुन:श्च भरलेले ऑनलाईन आवेदनपत्र अंतिम समजून पहिले आवेदनपत्र रद्द करण्यात येईल.

शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी-२०२५ परीक्षा दि. २४ मे ते दि. ५ जून, २०२५ या कालावधीमध्ये घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. बी.एड व एम.एड, महाराष्ट्र लोकसेवा आयोग परीक्षा तसेच इतर स्पर्धा परीक्षेस प्रविष्ठ असणाऱ्या विद्यार्थी, उमेदवारांचा परीक्षा कालावधी दि. २४ मे ते दि. ५ जून, २०२५ या कालावधीत नियोजित असलेल्या विद्यार्थी, उमेदवारांनी आपली माहिती विहित नमुन्यात परीक्षा परिषदेने दिलेल्या लिंकद्वारे दि. १४ मे, २०२५ पर्यंत सादर करावी. जेणेकरुन शिक्षक अभियोग्यता व बुध्दिमता चाचणी परीक्षा-२०२५ परीक्षेला प्रविष्ठ असलेल्या उमेदवारांचे परीक्षेच्या बॅचेसचे नियोजन करणे सुलभ होईल.

उमेदवारांनी वर दिलेल्या लिंकद्वारे विहित मुदतीत माहिती सादर न केल्यास उमेदवार परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील, असे आयुक्त, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.



**हिंगोली- शहरात उघड्यावर मांस विक्री करणाऱ्या ११ दुकानांवर नगर परिषदेच्यावतीने कार्यवाही करीत या दुकानांना सील ठोकण्यात आले. यावेळी मुख्याधिकारी अरविंद मुंडे, अभियंता प्रतीक नाईक, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांच्यासह नगर पालिकेचे पथक उपस्थित होते. छाया- सुनील पाठक**

# हिंगोलीत महाराणा प्रताप जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मे**



शहरातील महाराणा प्रताप चौकात महाराणा प्रताप यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

याप्रसंगी हिंगोलीचे आमदार तान्हाजीराव मुटकूळे, आ.संतोष बांगर, भाजपा जेष्ठ नेते प्रा. दुर्गादास साकळे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी नगराध्यक्ष गणेश लुंगे, माजी नगरसेवक गणेश बांगर पहेलवान, उमेश गुठठे, राजपूत समाज जिल्हाध्यक्ष अरुणसिंह ठाकूर, माजी नगरसेवक तथा भाजपा जिल्हाउपाध्यक्ष शंभूसिंह गहिलोत, संत नामदेव बँकेचे सरव्यवस्थापक अनिलसिंह सिन्हा, गजानन पवार, भाजपा जिल्हाध्यक्ष राजू यादव, बजरंग दलाचे राजेंद्र हलवाई, वि. हिंदू परिषद जिल्हाध्यक्ष सावरमलजी झुनझुनवाला, भाजपा शहराध्यक्ष रणजीत पुरोहीत, शिवानंद होकर्णे, मनोज शर्मा, शाम पहेलवान, देविसिंह ठाकूर, मुन्ना ठाकूर, उदय ठाकूर, रामसिंग ठाकूर, ईश्वर ठाकूर, दिगांबर टाक, रज्जू भैया, गणेश कहार, अजयसिंह राजपूत आदी उपस्थीत होते.

# खा नागेश पाटील यांच्या अध्यक्षतेत दिशा समितीची बैठक



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मे**

केंद्र शासनाच्या विविध योजनांची गाव पातळीवर परिणामकारक अंमलबजावणी व्हावी तसेच योजनेत लाभार्थ्यांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी दि ९ मे रोजी येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात उबाठा शिवसेनेचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

यावेळी खा नागेश पाटील आष्टीकर यांनी घरकुल, वीज महावितरणच्या विविध योजना, जलयुक्त शिवार अभियान, कृषी विभागाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. तसेच अधिकाऱ्यांना जनतेचे तसेच शेतकऱ्यांची कामे तत्काळ करण्याच्या आणि योजनेतील लाभार्थींना योजनेचा लाभ मिळण्यासाठी योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी असे स्पष्ट आदेश आ. आष्टीकर यांनी दिले. गावपातळीपर्यंत केंद्र शासनाच्या योजना पोहोचल्या पाहीजेत असे निर्देशही यावेळी खा पाटील यांनी दिले.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश, अतिरिक्त जिल्हाधिकारी अनिल माचेवाड, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार भूजबळ, उबाठाचे जिल्हाप्रमुख गोपू पाटील आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी विविध विभागाचे प्रमुख तसेच कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### डिग्रस कऱ्हाळे येथे छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबीर



हिंगोली- तालुक्यातील डिग्रस कऱ्हाळे येथे दि ९ मार्च रोजी महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग तहसील कार्यालय हिंगोली यांच्या वतीने डिग्रस कऱ्हाळे येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार भुजबळ यांनी शासनाच्या विविध योजनेची माहिती उपस्थित ग्रामस्थांना दिली. यावेळी उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे तसेच तहसीलदार भुजबळ यांच्या हस्ते शेतकऱ्यांना सातबारा फेरफार, जन्म मृत्यू उत्पन्न दाखला रहिवासी प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. यावेळी मंडळाधिकारी आरगडे, तलाठी गोटे, अंगणवाडीच्या सुपरवायझर ढोकणे, तसेच संभाजी कऱ्हाळे, गुलाब कऱ्हाळे, रावसाहेब कऱ्हाळे, रमेश कऱ्हाळे, कवी शिवाजी कऱ्हाळे, जगन कऱ्हाळे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गिराम यांनी केले.

### रूक्मीणी उच्च माध्यमिक विद्यालयाचे यश



हिंगोली- सेनगाव तालुक्यातील पळशी येथील रूक्मीणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी बारावीच्या परीक्षेत यश मिळवले आहे. विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के तर कला शाखेचा निकाल ८८ टक्के लागला आहे. विज्ञान शाखेत कु आरती गजानन काळबांडे प्रथम, जयश्री रविकांत जाधव द्वितीय, आश्विनी भारत सरकटे तृतीय आली आहे. कला शाखेत पल्लवी संतोष लांडगे प्रथम, उत्कर्षा राजाराम लांभाडे द्वितीय, आश्विनी आंबादास मुटकुहे तृतीय आली आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार संस्थेच्या अध्यक्षा सौ अनिता शिवाजीराव वाठोरे, सचिव स्वप्नील वाठोरे, कार्यकारी अध्यक्ष शिवाजीराव वाठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य तावरे यांच्यासह प्राध्यापक, शिक्षकांनी केला आहे.

# ॲग्रीस्टॅकबाबत जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मे**

कळमनुरी तालुक्यातील वाकोडी येडोबा येथे आयोजित ग्रीस्टॅक शिबिराला जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी गावातील नागरिकासोबत ग्रामस्तरावरच्या विविध योजनाबद्दल मार्गदर्शन केले व गावकऱ्यांकडून गावामध्ये असलेल्या समस्या जाणून घेतल्या. तसेच संबंधित विभागाला नागरिकांच्या समस्या सोडविण्याच्या सूचना दिल्या. यावेळी गावात बँक नसल्यामुळे शेतकऱ्यांना सात किलोमीटर लांब बँकेत जावे लागते. यासाठी गावच्या लोकसंख्यानुसार बँक द्यावी, अशी मागणी केली. यावर जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी बँक शाखा देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन त्यांना दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी प्रतीक्षा भुते, तहसीलदार जीवक कांबळे यांच्यासह मंडळ अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, तलाठी, ग्राम सेवक, उपसरपंच, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विदर्भात महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे अधिवेशन स्वातंत्र्यसेनानी गंगाप्रसाद अग्रवाल व्यासपीठ

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ९ मे**

राष्ट्रीय एकात्मता, सर्वधर्मसमभाव, शांतता, सत्य अहिंसा मूल्यांचा प्रचार आणि प्रसार करणाऱ्या राज्यव्यापी महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे राज्यस्तरीय अधिवेशन विदर्भात, अकोला जिल्ह्यातील पातुर येथे ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी तथा लोकसेवक गंगाप्रसादजी अग्रवाल स्मृती व्यासपीठावर दि. १० शनिवारी आयोजिण्यात आल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी येथे दिले आहे.

राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचाराने प्रभावित होऊन कार्यरत सर्वोदय कार्यकर्ते, सर्वोदय मित्र, लोकसेवकांचे राज्यस्तरीय अधिवेशन पातुर येथील श्री. गुरुदेव सेवा आश्रमात, स्वातंत्र्यसेनानी तथा लोकसेवक गंगाप्रसादजी अग्रवाल व्यासपीठावर दि. १० शनिवारी पार पडणार आहे. राज्यातील नामवंत हभप तथा आचार्य हरिभाऊ वेरुळकर गुरुजी (बुलढाणा) यांच्या हस्ते अधिवेशनाचे उद्घाटन होणार आहे. अखिल भारतीय सर्वोदय मंडळाचे प्रबंधक ट्रस्टी तथा ज्येष्ठ सर्वोदय विचारवंत महादेवभाई विद्रोही (अहमदाबाद-गुजरात), महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे माजी अध्यक्ष शंकरराव बगाडे (मुंबई), सेवाग्राम आश्रम प्रतिष्ठानचे अध्यक्ष आबा कांबळे (कोल्हापूर), भूदान यज्ञ मंडळाचे विश्वस्त सदस्य मदनभाई येवले (वाशिम), सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल (हिंगोली) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. पहलगाम येथील दहशतवादी हल्लयातील २६ शहिद पर्यटकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे. भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त प्रस्ताविकेचे वाचन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे येत्या वर्षभरातील विधायक, समाजोपयोगी कार्यक्रमांची रूपरेखा सुनिश्चित करण्यात येणार असल्याचे समर्पित सामाजिक कार्यकर्ते विशाल अग्रवाल यांनी सांगितले. महाराष्ट्र सर्वोदय मंडळाचे संयोजक डॉ. धर्मेंद्र राजपूत, अकोला जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष डॉ. शंकरराव सांगळे, कोल्हापूर जिल्हा सर्वोदय मंडळाच्या अध्यक्षा विधिज्ज्ञ प्रमिला सावंत, हिंगोली जिल्हा सर्वोदय मंडळाच्या अध्यक्षा शुभदा सरोदे, वर्धा जिल्हा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष संदेश राउत आदीं अधिवेशनासाठी परिश्रम घेत आहेत.

स्वातंत्र्यसेनानी गंगाप्रसादजी अग्रवाल स्मृती व्यासपीठावर 'गौरव'

सर्वोदय क्षेत्रातील राज्यात कार्यरत लोकसेवक, सर्वोदय मित्रांचा श्री. गुरूदेव सेवा आश्रमात उभारलेल्या, स्वातंत्र्यसेनानी तथा लोकसेवक गंगाप्रसादजी अग्रवाल स्मृती व्यासपीठावर विशेष योगदानाबद्दल पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते 'गौरवान्वित करण्यात येणार आहे.

# हिंगोली बस स्थानकात चोरी करणारी महिला जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २ मे**

येथील बस स्थानकात गर्दीचा गैरफायदा घेत एक महिला काही लहान मुलींच्या मदतीने महिलांच्या गळ्यातील सोन्याचांदीचे दागिने चोरी करतांना शहर पोलिसांनी जेरबंद केली आहे.

याबाबत अधिक माहीती अशी की सध्या लग्नसराई असल्यामुळे हिंगोली बस स्थानकात प्रवाशांची मोठी गर्दी होत आहे. या गर्दीचा गैरफायदा धेत एक महिला लहान मुलींच्या मदतीने महिलांचे सोन्याचांदीचे दागिने लंपास करून बस स्थानकाजवळ एका उकिरड्यामध्ये ठेवत असल्याची माहीती पोलिसांना मिळाली तसेच दि ९ मे रोजी पल्लवी धम्मदीप वाकळे या हिंगोली बसस्थानकातून कळमनुरीला अमरावती ते कंधार बसमध्ये चढत असतांना सदर महिलेने गर्दीचा गैरफायदा घेत गळ्यातील मनीमंगळसु९ चोरले. याप्रकरणी पल्लवी वाकळे यांच्या फिर्यादीवरून सदर महिलेवर हिंगोली शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी तत्काळ चोरी करणाऱ्या महिलेचा आणि तिच्यासोबत असलेल्या मुलींची चौकशी केली असता या मुलींनी सर्व हकीकत सांगितली. त्यानंतर पोलिसांनी सदर महिलेला ताब्यात घेतले आहे. तिची चौकशी पोलिस करीत असल्याची माहीती पोलिस निरीक्षक नरेंद्र पाडळकर यांनी दिली आहे. तसेच प्रवास करीत असतांना प्रवशांनी किंमती सामान, दागिने तसेच पाकीटे सांभाळावीत असे आवाहन पाडळकर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## आनंदाचे डोही

**अपर्णा कुळकर्णी** / ९४२१२१२४४८

# वाचनानंद!



सोहम, खरंच किती भाग्यवान! पणजोबा ज्ञानेश्वरी वाचत आहेत आणि तोही आपल्या इवल्या हातात मावेल, असे एक पुस्तक घेऊन दिमाखाने त्यांच्या बाजूला बसून चित्रवाचन, अक्षरवाचन करीत आहे. हे दृश्य आता दुर्मिळ तर झालंच आहे आणि हळूच काळचक्राच्या पोटात गडप होऊ पाहतंय. पण, त्या कोवळ्या जीवाला वाचन वेड लावणारे ते वाचनानंदी सुखद चैतन्याचे क्षण, हृदय कुपीत जतन करून ठेवावेसे असेच नाही का? आजीआजोबांसोबत वाचन मात्र, अजूनही आनंदी झुला झुलता ठेवू शकते. छोट्या वाचकाचे मोहक रूपडे, वाचनाचा मोठ्ठा आनंद चेहऱ्यावर झळकतानाचा तो रुबाब खासच अनुभवायला मिळतो. काळाची पावलं भरधाव वेगाने, तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मानवी जीवनात अनेक बदलांची नांदी देत आहेत तरी, वाचनाचा अक्षय्य आनंद ठेवा जोपासून भावी पिढीत तो संक्रमित करण्यासाठी आपण जोमाने कार्यरत रहायला हवे, असे वाटत राहते. सांगू या का आपण आपल्या घरातील, आसपासच्या बालगोपालांना ...

किताबें करती हैं बातें, सुंदर सुंदर फुलोंकी।
किताबें, कुछ कहना चाहती हैं, तुम्हारे पास रहना चाहती हैं।
किताबों में चिडियाँ चहचहाती हैं, किताबों में खेतियाँ लहलहाती हैं
किताबों में झरने गुनगुनाते हैं, परियों के क़िस्से सुनाते हैं
किताबों में रॉकिट का राज़ है, किताबों में साइंस की आवाज़ है
किताबों का कितना बडा संसार है, किताबों में ज्ञान की भरमार है
क्या तुम इस संसार में, नहीं जाना चाहोगे?
आनंद को अगर हो पाना, पढना होगा तुम्हें, पढना होगा तुम्हें।

हे आपल्या कृतीतून रुजवले तर आपणास जो अपरिमित आनंद मिळेल तो अवर्णनीयच असेल, होय ना!

वाचनाची गोडी लागली की, पुस्तकं सवंगडी कसे होतात? ते कळतसुद्धा नाही. इतकं घट्ट नातं निर्माण होतं. मग, आपलं पुस्तकांशी हे त्यांना समजलं, उमगलं की बहारच! कुतूहल निर्माण करून, उत्सुकता वाढवत ज्ञानसागरी विहार करवतात ही पुस्तके हे कळले की, ते ही आनंद डोहात डुंबत राहतील. अरे व्वा, बापरे, चक्क असे काही उद्गार पुस्तकं वाचताना त्यांच्या मुखातून बाहेर येतील, तेव्हा त्यांच्या बुद्धीच्या रोषणाईला सकारात्मक प्रतिसाद घरातील सर्वांनी द्यायला हवा.

नुकताच २३ तारखेला पुस्तक दिवस झाला. त्या निमित्ताने अनेक उपक्रम राबविण्यात आले. या उन्हाळी सुट्टीत आइस्क्रीम-कुल्फीसोबत पुस्तकं वाचनाचा अक्षय्य ठेवा बालमनाला देऊन त्यांचे जीवन समृद्ध करू या! जशी आपल्या पिढीला पुस्तकांची जाण आहे. विषयांचे वैविध्य खुणावत राहतं तसंच, भावी पिढीला ही खुणावत राहायला हवं, हे पुस्तकांचं विश्व! पुस्तकात अवघं विश्व सामावण्याची ताकद असते आणि अमोघ आनंदाचं शिवधनुष्य ते पेलत असतात.

पुस्तकांचं जग अफाट आहे. आपल्या देशांत तर कुबेर खजिनाच आहे. एकच पुस्तक किती बहुआयामी असतं, हे मीना प्रभूंसोबत जगाची सफर घडताना तेथील संस्कृतीचीही ओळख होताना, कितीतरी पैलू नकळत समोर येतात तेव्हा जाणवत राहतं. सोबतच एक सक्षम, कणखर आणि खंबीर स्त्री या लेखनामुळे उलगडून कित्येक स्त्रियांना एकटीने पर्यटनाला जाण्याची हिंमत दिली, ती त्यांनी लिहिलेली पुस्तकं वाचल्यामुळेच ना! अशी पुस्तकं आजच्या युवतींसाठीही आजही प्रेरक आहेत. आपले बोट धरून कड्या कपाऱ्यातून, दऱ्याखोऱ्यातून फिरवत, गडकिल्ल्यावर नेऊन इतिहास उभा करून दाखवत राहतात ही पुस्तके! तेव्हा त्यातील पात्रांचे जिवंत चित्रीकरण अनुभवून, मन त्या कालखंडात आणि पुस्तक हातात अशी स्थिती होते. पुस्तकांच्या अथांग सागरात थोडावेळ तरी विहार करून, अनमोल खजिना आपल्या पदरात पाडून घ्यायला हवा. 'दिसामाजी काहीतरी लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे' असे समर्थ रामदास स्वामींनी दासबोधात सांगून ठेवलं आहे. सुधा मूर्तींचे म्हणणे तर प्रत्येकाने आपल्या मनावर कोरून घ्यायला हवं, असं त्या म्हणतात. ज्यांच्याकडे पुस्तकं नाहीत तो गरीब जरी तो अरबोपती का असेना. त्यांची श्रीमंतीची व्याख्या पुस्तक, ज्ञान, वैचारिक संपदेशी जोडलेली आहे. ती व्याख्या त्यांच्या व्यक्तिमत्वातून झळकत असते. आजच्या काळात अशी व्यक्ती सापडणं फार कठीण आहे. उच्च विचारसरणी साधी राहणी हे त्यांच्या वाचन संस्कारांचे गमक होय.

नुकताच २३ तारखेला पुस्तक दिवस झाला. त्या निमित्ताने अनेक उपक्रम राबविण्यात आले. या उन्हाळी सुट्टीत आइस्क्रीम-कुल्फीसोबत पुस्तकं वाचनाचा अक्षय्य ठेवा बालमनाला देऊन त्यांचे जीवन समृद्ध करू या! जशी आपल्या पिढीला पुस्तकांची जाण आहे. विषयांचे वैविध्य खुणावत राहतं तसंच, भावी पिढीला ही खुणावत राहायला हवं, हे पुस्तकांचं विश्व! पुस्तकात अवघं विश्व सामावण्याची ताकद असते आणि अमोघ आनंदाचं शिवधनुष्य ते पेलत असतात.

'छंद वाचनाचा, देतसे आनंद...वाचनाने लाभतो, ज्ञान मकरंद' पुस्तके जीवनऊर्जेचे अखंड स्रोत असतात. त्या निर्झरासंगे ज्ञानप्रवाही होण्याचा आनंद फार मोठा असतो. निसर्ग सान्निध्यात वाचन करण्याचा आनंदयोग तर अवर्णनीयच! वाचनाने जीवनाकडे बघण्याची व्यापक दृष्टी लाभते. पुस्तकेच प्रसंगी समुपदेशकाचे काम करून जातात. खवळलेल्या मन समुद्राला शांत करून विचाररत्नांची देण नकळत बहाल करून जातात हे सगे सोयरे! त्यांचे आपल्याकडून कोणतेच मागणे नसते केवळ, एक साद असते वाचा आम्हाला अन् ज्ञान समृद्ध व्हा! निरपेक्षपणे त्यांच्या सहवासात रमणाऱ्या प्रत्येकाला वैचारिक परिस स्पर्श करण्यासाठी मात्र, पुस्तके धडपडत असतात. वाचकांच्या नेत्रज्योतींना प्रकाशमान करण्यासाठी आतुर असतात ते अक्षरदीप! नैराश्याच्या काळात मनाला उभारी देणारी चरित्रे, प्रेरणादायी, सकारात्मक पुस्तके मनावरची काजळी हळुवार पुसून टाकतात. मनात आशेचा कोंब तरारून वर येतो. नवीन वाटेवर ग्रंथ माझे सांगाती, म्हणून दीपक होऊन आयुष्याला झगमगते ठेवतात. एखाद्या पुस्तकातील एखाद्या वाक्याने एखाद्याचे जीवनच बदलून जाते. हे सजग वाचकांना चांगले ज्ञात आहे. आपल्या विचार पद्धतीला दिशा देण्याचे, अमोलिक कार्य करणारे हे शब्दधन आजच्या काळात मात्र, बुद्धीच्या कसोटीवर तपासून घेणे गरजेचे ठरतेय.

साऱ्या जगाला, अवतीभवतीच्या परिसरालाच नव्हे तर मनातील इतर विचारांना विसरायला लावून आपण पुस्तकांशी अनन्य होतो. एकदा पुस्तक हातात घेतले की, ते पूर्ण होईस्तोवर खाली न ठेवण्याची नशा ज्यांनी अनुभवली त्यांना हा आनंदाचा ठेवा गवसला आहे. आपल्या पिढीने मनमुराद आनंद लुटला आहे. वाचनाचा आणि लुटत राहणार. चला तर मंडळीनो, बालगोपाळांसोबत गंमाडी गंमत करत, वाचनानंद घेऊ या!

---

# भद्रकाली ताराराणी...

***दिल्ली झाली दिनवाणीं दिल्ली शाचे गेले पाणी।***
***ताराबाई रामराणी भद्रकाली कोपली॥***
***ताराबाईच्या बखते दिल्ली पतीची तखते।***
***खचो लागली तेवी मर्तेकुराणे ही खंडली॥***
***रामराणी भद्रकालीं रणांगणी कृद्ध झाली।***
***प्रलयाची वेळ आलीं मुघल हो सांभाळा॥***

तत्कालीन कवी गोविंद यांनी ताराराणीच्या पराक्रमाची, शौर्याची प्रशंसा करताना लिहिलेल्या ओळी, तिच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाचे यथायोग्य वर्णन करतात. पराक्रमाच्या तेजाने तळपणारी ही स्त्री खरोखर असामान्य! रणमर्दीनी, भद्रकाली रणचंडीका बनून मुघलांविरुद्ध अखंड संघर्ष करीत, स्वराज्याचा ध्वज तिने फडकत ठेवला. अशा या तेजस्वी विरांगनेची ही एक संघर्ष गाथा! छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्नुषा म्हणून भोसले घराण्यात आलेल्या ताराराणी छत्रपतींचे सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या कन्या! अगदी बालपणापासून पित्याचं शौर्य, पराक्रम, शिवाजी महाराजांबरोबर केलेल्या मोहिमा, संघर्ष बघत त्या लहानाच्या मोठ्या झाल्या. पराक्रमाचा वारसा रक्तात भिनला होता. सदरेवरचे राजकारण, मोहिमांची बांधणी, शस्त्रास्त्र कलेने परिपूर्ण, घोड्यावर तासन्तास मांड ठोकून एका गडावरून दुसऱ्या गडाचे टोक गाठणाऱ्या ताराराणी बुद्धिमान आणि तडफदार होत्या. आयुष्यात अनेक अतर्क्य गोष्टी घडतात तसंच, त्यांचं जीवनही अनेक विलक्षण घटनांनी भरलेलं होतं. राजाराम महाराजांना एकंदर चार पत्नी जानकीबाई, ताराराणी, अहल्याबाई आणि राजसबाई ! ताराराणीचा राजारामशी विवाह संभाजीराजांनी घडवून आणला. संभाजी राजे सिंहासनपदी आले आणि स्वातंत्र्याचा अखंड अग्नी प्रज्वलित ठेवताना, दख्खन सतत संघर्षातून जात होता. त्या हे सगळं बघत होत्या पण, आयुष्याला अचानक कलाटणी मिळेल, याची त्यांना कल्पना नव्हती. संगमेश्वरी संभाजी महाराज पकडल्या गेले आणि औरंगजेबाने त्यांना अतिशय दुःखद मृत्यू दिला.



**शुभांगी गान**/८६५७४२४०७१

त्यावेळी जुल्फी कारखानाने रायगडाला वेढा दिला होता. अनेक दरबारवासी रायगडावर अडकून पडले होते अन् राज्याला वारस नव्हता. अशा स्थितीत महाराणी येसूबाईंनी एक अत्यंत महत्वपूर्ण निर्णय आपल्या अधिकाऱ्यांसमोर मांडला. त्यांनी आपला पुत्र शाहू याला गादीवर न बसवता, आपला दिर राजाराम महाराज यांना सिंहासनपदी विराजमान केले. औरंगजेबाच्या तावडीत ते सापडू नये यासाठी त्यांनी त्यांची कर्नाटकातील जिंजी येथे रवानगी केली. आणि, त्या मात्र आक्रमकतेने किल्ला लढवत राहिल्या. ताराराणी, राजसबाई, अहल्याबाई, धनाजी जाधव, संताजी घोरपडे, खंडोबल्लाळ अमात्य शंकराजी नारायण यांच्याबरोबर ताराराणी विशाळगडाकडे रवाना झाल्या. इथे एक महत्त्वाची बैठक घेण्यात आली आणि दख्खन-कोकण असे दोन भाग करण्यात येऊन, एकीकडे रामचंद्रपंत तर दुसरीकडे शंकराजी नारायण व ताराराणी असा कारभार राजाराम महाराजांनी सोपवून दिला. प्रत्येक जण आपापले प्रांत सांभाळत होता पण, या मधल्या काळात नऊ महिन्याच्या अखंड संघर्षानंतर रायगड पडला होता. येसूबाई आणि त्यांचे पुत्र शाहू महाराज औरंगजेबाच्या कायद्यात पडले. त्यांच्याबरोबर रायगडावर असणाऱ्या राजारामाच्या पत्नी जानकीबाईही औरंगजेबाच्या नजरकैदेत रवाना झाल्या.

ताराराणी महाराज राजारामाच्या समवेत खंबीरपणे उभ्या राहिल्या. दख्खनचा कारभार, मसलत, सल्ले आणि राजकारण त्या जिंजीला पोहचल्यानंतर तडफेने सांभाळत होत्या. मुळात नाजूक प्रकृती असलेले राजाराम महाराज जिंजीबाहेर पडून महाराष्ट?ात परतले. पण, प्रकृती म्हणावी तशी साथ देत नव्हती. गुजरातची मोहीम अर्धवट टाकून ते सिंहगडी परतले आणि इ. स.१७०० मध्ये वयाच्या केवळ ३१ व्या वर्षी त्यांचे निधन झाले.

दख्खन पुन्हा हादरला आणि औरंगजेब अत्यानंदित झाला. आता या दोन विधवा आणि त्यांची दोन मुलं यांना संपवलं की, दख्खनही आपलाच! पण, इथेच त्याने भयंकर चूक केली होती. ताराराणींनी या गडकिल्ल्याविषयीचं एक तंत्र बनवलं होतं. कोणताही किल्ला पावसाळा येईपर्यंत लढवायचा आणि नंतर मुघलांच्या ताब्यात देताना त्यांच्याकडून भरपूर रक्कम वसूल करायची आणि पावसाळा संपताच तो किल्ला परत एकदा जिंकून घ्यायचा. तिने अवलंबिलेली युद्धनीती अनोखी होती. शत्रूवर टोळधाडीसारखं अचानक बरसायचं आणि आक्रमण झालंय, हे ध्यानात यायच्या आत अदृश्य व्हायचं. तिच्या या नीतीमुळे औरंगजेबही आणि त्याची सेना हवालदिल झाली होती. एका स्त्रीचं हे प्रखर शत्रुत्व तो चिकाटीने सांभाळत होता.

राजारामानंतर अखंड सात वर्षे तिने मुघलांना सळो की पळो करून सोडलं होतं. वर्ष १७०७ मध्ये औरंगजेबाचा मृत्यू झाला. त्याचा पुत्र आझमशहाने शाहू महाराजांना कैदेतून मोकळं केलं. याचं कारण एकच मराठ्यांमध्ये दुफळी निर्माण व्हावी आणि झालही तसंच, ताराराणींना वाटत होतं जे स्वराज्य आम्ही निष्ठेने अखंड संघर्ष करून सांभाळलं आहे, ते शाहूच्या स्वाधीन का करावं? कोल्हापूर आणि सातारा या दोन गाद्या निर्माण झाल्या पण, परिस्थिती कधीच एकसारखी असत नाही. इतके वर्ष स्वतःच्या पराक्रमाने गर्जणाऱ्या ताराराणींना आणि त्यांचा मुलगा शिवाजी यांना राजसबाईंनी तुरुंगात टाकलं आणि आपला पुत्र दुसरा संभाजी याला गादीवर बसवलं. जवळपास वर्ष १७३० पर्यंत त्या कैदेत होत्या. त्यांच्या मुलाचा मृत्यूही त्यांनी पाहिला. वर्ष १७३० नंतर शाहू महाराजांकडे साताऱ्याला परतल्या. शाहू महाराजांच्या मृत्यूपर्यंत त्या तिथेच होत्या. सरसेनापती उमाबाई दाभाडे यांच्याबरोबर त्या राजकारणातही सक्रिय राहिल्या. मराठ्यांना आर्थिक मानसिक बळ देणारी ही महाराणी, ९ डिसेंबर १७६१ रोजी अनंतात विलीन झाली.

---

## अभिजात अमृत

**प्रा. सुनंदा पाटील**/ ८४२२०८९६६६

# सुखकर्ता दुखहर्ता...

नमस्कार सर्वांना ! अभिजात मराठीच्या सन्मानाप्रित्यर्थ आपण मराठीच्या काही साहित्य प्रकारांची माहिती घेतोय. सुरुवातीला यात काय घेता येईल याचा विचार केला तेव्हा, मराठीचा अवघा संसार डोळ्यांसमोर उभा झाला. सगळेच गद्य आणि पद्य प्रकार खुणावत होते. मग एकेक भाग बघता लक्षात आलं की, मराठीची सर्वच दालनं अतिशय समृद्ध आहेत. म्हणून त्यातला 'मराठी कविता' हा भाग घेतला. कवितेतील प्रत्येक वेळी एक वेगळा प्रकार घेऊन आपण त्याची माहिती करून घेण्याचा प्रयत्न करतोय.


सध्या संतकाव्य आणि पंडिती काव्य इथपर्यंत आपण पोचलोय. संतकाव्यामधीलसुद्धा काही भाग अजून राहिला आहे. तसंच, पंडिती काव्यसुद्धा खूप वैशिष्ट्यपूर्ण आहे. म्हणून संतकाव्यातलाच एक भाग आज आपण बघणार आहोत. पुढे शाहिरी काव्य, नवकाव्य वगैरे खूप मोठा भाग आपण घेणार आहोतच.

आज 'आरती या काव्यप्रकाराबद्दल आपण विचार करू या ! गोंधळलात ना? आपल्या नेहमीच्या आयुष्यातील एक भाग म्हणजे आरती! आरतीमधेही काव्य आहे, हे कधी आपल्या लक्षातच येत नाही. जसं स्त्रीसौंदर्याची कल्पना करताना षोडशवर्षा ते पंचेविशीतील तरुणी यांचाच विचार होतो किंवा घरातल्या/शेजारच्या बऱ्याच स्त्रिया आपल्याला सुंदर दिसतात. त्यात आपली 'आई'सुद्धा एक सौंदर्यवती आहे, हेच आपल्याला कळत नाही. कारण, आईला आपण नेहमीच फक्त गृहीत धरलेलं असतं. ती जर नोकरीची नसून फक्त गृहिणी असेल तर, फारच गृहीत धरलं जातं. तेच 'आरतीचं' होतंय!

आजकाल तर कवितेच्या सर्व प्रकारच्या स्पर्धा होतात पण, आरतीची स्पर्धा (लिहिणे/सादर करणे) झालीय, असं कधीच दिसत नाही. तसंच, साहित्यात नवीन आरत्यांचीही फारशी भर पडत नाही. त्याचे मुद्दाम काढलेले संग्रह दिसत नाहीत. नाही म्हणायला नागपूरच्याच सरोज अंदनकर यांचा 'कैवल्य' हा आरती संग्रह प्रकाशित झालाय. पण, अशी उदाहरणे मात्र विरळाच! आख्यान काव्यासंबंधी आपण मागच्याच लेखात माहिती घेतली. किर्तनानंतरही आरती केली जाते शिवाय, आरती झाल्यानंतर आरतीचे तबक कीर्तनकर्त्यांजवळ ठेवले जाते. प्रत्येक भक्त तबकात जमेल तसे पैसे टाकून, आरती घेऊन नंतर कीर्तनकारांना नमस्कार करून पुढे जातो. त्यांना दिलेल्या बिदागीशिवाय त्या तबकात जी काय प्राप्ती होते, ती कीर्तनकाराला दिली जाते. पूर्वी उत्पन्नाचे हेही एक साधन होते. तसेच, आपण काहीतरी छानसं बौद्धिक ऐकलं तर त्याची 'परतफेड' करण्याच्या भावनेतूनसुद्धा हा प्रकार आला असावा. इतरांकडून फुकटचं काही घ्यायचं नाही, ही आपली संस्कृती आहे.

आता आरती म्हणजे काय? आरती म्हणजे देवदेवतांच्या पूजेमध्ये त्यांच्या स्तुतीसाठी केलेले एकप्रकारचे स्तोत्र किंवा प्रार्थना! देवदेवतांना दर्शविण्यासाठी किंवा त्यांचे स्मरण करण्यासाठी आरती केली जाते. यात निरांजन, कापूर वापरला जातो त्यामुळे, वातावरण प्रसन्न होते. हिंदू धर्मात श्री गणपतीला अग्रपूजेचा मान आहे. म्हणूनच गणपतीची आरती सर्वप्रथम केली जाते. अगदी प्रत्येक घरातली देवाची नित्य पूजा असली तरीही, प्रथम श्रीगणेशाची आरती होते.

***'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची,***
***नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची...***
***सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची,***
***कंठी झळके माळ मुक्ताफळांची...***
***जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती,***
***दर्शनमात्रे मनकामना पुर्ती...***



ही समर्थ रामदास स्वामींनी लिहिलेली आरती अगदी सर्वांना तोंडपाठ आहे. मुळात ही आरती फार मोठी आहे. मात्र, श्री गणेशाचे वर्णन करणारी दोन कडवी तेवढी आपण म्हणतो. श्री गणपतीच्या आरतीनंतर, आपल्या कुलदैवताची आरती केली जाते. त्यापाठोपाठ देवीची, नंतर इष्ट देवतेची आरती म्हणावी अशी परंपरा आहे. पूजेच्या वेळी एकापाठोपाठ किमान तीन आरत्या म्हटल्या जाव्यात, अशीही पद्धत आहे. अनेकदा लोक त्यापेक्षा जास्त आरत्या म्हणतात. पण, त्या विषय संख्येत असाव्यात.

आरती हा काव्यप्रकार सामान्यपणे गीत प्रकार/ओवी प्रकार यात रचलेला आहे. यातही प्रथम धृवपद त्यानंतर काही कडवी असाच क्रम असतो. याचं वैशिष्ट्य म्हणजे धृवपद किंवा कडव्याची शेवटची ओळ पूर्ण झाली की,'जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती' किंवा 'जयदेवी जयदेवी जय माये तुळशी' असं पालुपद म्हटलं जातं. सर्वांनाच सर्व आरत्या तोंडपाठ येतात, असं नाही. तेव्हा एखादा माणूस किंवा गुरुजी आरती म्हणतात आणि जमलेली मंडळी पालुपद म्हणून त्यांना साथ देतात. आजच्या भाषेत कदाचित आपण याला कोरस म्हणू शकतो.

आरतीची व्युत्पत्ती किंवा मूळ काय? आरती ही वैदिक अग्निविधी किंवा यज्ञापासून निर्माण झाली आहे, असे मानले जाते. आरती ही संस्कृत शब्द 'आरात्रिक' म्हणजे अंधार दूर करणारी गोष्ट असा आहे. आरती ही प्रेम, परोपकार, कृतज्ञता, प्रार्थना, स्वागत किंवा इच्छा यासारख्या अनेक पैलूंची अभिव्यक्ती आहे, जी ती कोणत्या उद्देशासाठी केली जाते यावर अवलंबून असते. उदाहरणार्थ, आरती ही वडीलधाऱ्या व्यक्तीसाठी आदर दाखविण्याचा एक प्रकार असू शकते. देवतांची प्रार्थना करताना प्रार्थना असू शकते. घरे अथवा वाहनांसाठीसुद्धा आरती केली जाते. तेव्हा आशा व्यक्त केली जाते.

आरती करताना भावना आणि प्रार्थना बहुतेक वेळा शांत असतात. परंतु, हे सर्व विधी पार पाडणाऱ्या व्यक्तीद्वारे निश्चित केले जाते तेव्हा, देवतेकडे किंवा दैवी घटक, उदाहरणार्थ नदी यांच्याकडे तोंड करून देवाच्या रूपावर लक्ष केंद्रित केलं जातं. आरतीची ज्योत देवतेच्या विविध भागांना प्रकाशित करते. जेणेकरून आरती करणारा आणि पाहणारे त्या रूपाला चांगल्या प्रकारे पाहू शकतील आणि लक्ष केंद्रित करू शकतील.

आरती देवाभोवती घड्याळाच्या दिशेने वर्तुळाकार पद्धतीने ओवाळली जाते. प्रत्येक वर्तुळानंतर किंवा दुसऱ्या किंवा तिसऱ्या वर्तुळानंतर जेव्हा आरती तळाशी पोहोचते, तेव्हा ती जरा मागे घेऊन जरा वेळ घड्याळाचे चार ते सहा किंवा सहा ते आठ वाजण्याच्या स्थितीत हलवली जाते. नंतर, पुन्हा घड्याळाच्या दिशेने ओवाळली जाते. इथे कल्पना अशी आहे की, आपल्या दैनंदिन क्रियाकलापांचे प्रतिनिधित्व आरती करीत असते, जी आपल्या जीवनाचे केंद्र असलेल्या देवाभोवती फिरते. आरती करताना देवाकडे बघणे आणि आरती करणाऱ्याला देवाला सर्व क्रिया कलापांच्या केंद्रस्थानी ठेवण्याची आठवण करून देते. हे समजून घेण्यास बळकटी देते की, नित्य संसारिक क्रियाकलाप महत्त्वाचे आहेत. ही समज श्रद्धावानांना अनपेक्षित दुःख सहन करण्याची शक्ती देते आणि आनंदाच्या क्षणी त्यांना नम्र ठेवते आणि देवाची आठवण करून देते.

आरती म्हणजे एखाद्या व्यक्तीला देवत्व किंवा देवत्वाजवळचे स्थान आहे, असं वाटतं. यामुळे तिथे अहंकाराची जाणीवही नसते आणि उच्च सामाजिक, आर्थिक पद असूनही ती नम्र राहण्यास मदत होते. या विधीची तिसरी सामान्य समजूत अशी की, आरती सुख आणि इच्छांच्या शक्ती, व्यक्तीवर मात करू नयेत म्हणून आपल्याला जागृत राहण्याची आठवण करून देते. ज्याप्रमाणे उजळलेली वात प्रकाश प्रदान करते आणि अंधार दूर करते, त्याचप्रमाणे व्यक्तीची सतर्कता बहुतेक जगाच्या प्रभावापासून दूर ठेवू शकते.

मंडळी, मराठी काव्याचा आरती हा प्रकारसुद्धा किती मोठा आणि वेगळा आहे, हे या विवेचनावरून लक्षात आलं असेल. आज इथे थांबावे लागते आहे. आरती कुणाकुणाची केली जाते, आरतीचे प्रकार किती, ती कशी करतात, आरत्या कोणी कोणी रचल्या आहेत? हा सर्व भाग पुढल्या आठवड्यात येईलच. तेव्हा पुन्हा एकदा, श्री गणेशाची आठवण करून, जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती, असं म्हणून आज मी इथेच थांबते. पुन्हा भेटूच!

---

## वाडा चिरेबंदी

**विलास कोळी**/ ९७६३० ८४४९९

# गावोगावचे वाडे का पाहावेत?



पुढच्या पिढीला आपल्या मागच्या पिढ्यांनी काय संचित ठेवलंय? हे दाखवायचे असेल तर पुरातन गढी, वाडे, भुईकोट, गड, किल्ले पाहिले पाहिजेत तरच महाराष्ट्राची थोरवी कळेल. ते आपले ऐतिहासिक वारसा आहेत तो जपला पाहीजे, समजून घेतला पाहिजे. भक्कम वाड्याप्रमाणे त्यातील माणसंही तशीच होती. त्यांनीच इतिहास घडवला आहे. या वास्तू म्हणजे त्यांची स्मारकं आहेत, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.

वाडा हा शब्द जरी ऐकला तरी डोळ्यांसमोर भव्यदिव्य वास्तू उभी राहते. महाराष्ट?ाच्या अनेक गावांत आजही वाडा संस्कृती, आपले अस्तित्व टिकवून आहे व इतिहासाची साक्ष देत उभी आहे. विज्ञान युगामध्ये गगनचुंबी इमारतीचे जाळे संपूर्ण जगात बघायला मिळते. तरीही एखादी जुनी वास्तू दिसली की, काही क्षणांसाठी आपण थांबून त्या वास्तूकडे बघतो. त्या वास्तूचे आकर्षण वाटते किंवा ती वास्तू आतून कशी असेल हा विचार मनात निश्चितच येतो. म्हणूनच वाड्याच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकण्यासाठी हा लेखनप्रपंच!

वाड्याचे बांधकाम करताना, जमिनीच्या पूर्ण जागेवर बांधकाम करत. तुलना करायचीच म्हटली तर अलीकडील बंगले आणि जुने वाडे यांचे आराखडे बघितले तर परस्पर संबंध अगदी उलट दिसतो. बंगल्याच्या आराखड्यात प्लॉटच्या साधारण मध्यभागी बांधकाम, समोर व्हरांडा आणि चारी बाजूने मोकळी जागा असते. त्याच्या बरोबर उलट, वाड्यात मध्यभागी मोकळी जागा म्हणजेच चौक आणि चौकाभोवती खोल्यांचे बांधकाम केलेले दिसते.

गेली पंधरावीस वर्षे बांधकाम व्यवसायात अखंडपणे काम करत असताना, पुन्हापुन्हा या समृद्ध अशा शिल्पवैभवी महाराष्ट?ीयन वारशाकडे लक्ष गेलं की, मन विचलित होत होतं. त्यातूनच अभ्यास सुरू झाला. वाचन, निरीक्षण सुरू झाले. विविध व्याख्याने, शोज, वारसास्थळांना भेटी आणि सभासंमेलनातून हजेरी लावायला लागलो. अशा विषयात दिग्गजांनी लिहिलेली ग्रंथसंपदा अभ्यासू लागलो. गढ्या, वाडे, जुन्या वास्तू पाहण्यासाठी कायकाय धडपडी केल्या, याची जंत्री केली तर खूप मोठी होईल.

इतिहासाचा एक वाचक या नात्याने, जे जे ठावे आपणाशी ! ते ते सांगावे दुसऱ्यासी ! शहाणे करून सोडावे सकळ जन। या म्हणीप्रमाणे! महाराष्ट्राच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभवात मोलाची भर घालणाऱ्या, कित्येक शतकांचा वसा आणि वारसा जोपासणाऱ्या महाराष्ट्राच्या जडणघडणीत वाड्याचे योगदान मोठे आहे. इंजिनिअरिंगमध्ये जसे प्रत्येक रेषेला महत्व असते तसे पूर्वी बांधकामातील प्रत्येक घटक/ इलीमेंटला महत्व होतं. प्रत्येक घटक त्याचं काही ना काही महत्व आणि उपयुक्तता त्याकाळी दर्शवत होती.

वाडे संस्कृती हळूहळू लोप पावली असल्यामुळे, आज महाराष्ट?ामध्ये बोटांवर मोजता येतील इतकेच वाडे शिल्लक राहिलेत. मोठमोठे सरदार, जहागिरदार, सावकार, व्यापारी यांनी तालेवार पद्धतीने वाडे बांधले. अशा वाड्यांच्या दगडविटा घडून गेलेल्या इतिहासाच्या साक्षीदार आहेत. कुठे तलवारीचा खणखणाट झाला असेल, कुठे खलबतं शिजली असतील. आपापल्या घराण्याच्या वैभवाची साक्ष देणारा, कलाकुसर व वास्तुकलेचा उत्तम नमुना असलेले वाडे महाराष्ट्राचे आकर्षण आहेत. वाडे आणि गढ्या हे राजवैभवाचे प्रतिक तर आहेतच पण, ते यशस्वी व्यवस्थापनाचा आणि कारभाराचा नमुना देखील आहेत.

वाड्यातील विविध एलीमेंट्स त्या विशिष्ट काळावर प्रकाश टाकतात. वाड्यात असलेल्या विविध गोष्टी काहीतरी विचार करूनच निर्मिलेल्या असतात. अनेक बारीकसारीक गोष्टी आपल्याला वाडा कसा पाहावा, हे शिकवतात. कलाकारांच्या कलांना वाव देतात. मग ते कलाकार गवंडी असोत, स्थापती किंवा वास्तुविशारद असोत, मूर्तिकार-रंगारी असोत, लाकूड काम करणारे सुतार असोत किंवा दगडकाम करणारे पाथरवट! असे कुणीही असले तरी त्यांनी निर्मिलेली कला मनसोक्त पहावीत, अभ्यासावीत असे मनोमन वाटते.

वाडा म्हणजे गावखेड्याची शान, वाड्याची भव्यताच त्या मालकाची श्रीमंती दाखवत असते. रुंद, उंच व जाडजूड भिंती, दर्शनी भागातून डोकावणारी नक्षीदार लाकडी पडवी ही वाड्याची पहिली झलक! वाड्याच्या आतल्या भव्य मोकळ्या जागेत दगडी तुळशी वृंदावन, लाकडी कमान, प्रसन्नता वाढवणारं आतील लाकूड काम, लाकडी देवघर, दिवाणखान्यातील लोड-गाद्यांच्या बैठकीचा साज, छताला लटकवलेली लाकडी-काचेची झुंबरं, नक्षीदार लाकूडकाम, अघळपघळ स्वयंपाक घर, शयनकक्ष... सारी कशी शाही व्यवस्था! वाडा म्हणजे नुसती चहलपहल, उत्सव, आनंदाला उधाण! शेणाने सारवलेल्या सडा सारवणाच्या गंधात अन् काळपट हिरव्या रंगावर उठून दिसणारी शुभ्र रांगोळी! वाडा म्हणजे अन्नपूर्णेचा वास आणि दुष्काळात गावाला घास देणारं ठिकाण! अख्या गावाचं राजकारण, अर्थकारण चालवणारा, तहसीलदार, पोलीस, ग्रामसेवक, तलाठी, पटवारी... अशा कितीतरी अधिकाऱ्यांचे आश्रयस्थान असायचा वाडा! वाड्याची कथा वाचू या पुढील भागात...

# सद्गुरू बंकट स्वामी महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

**तभा वृत्तसेवा**
**नेकनूर दि.९ मे**

सद्गुरू बंकट स्वामी महाराज यांनी संत वामनभाऊ आणि संत भगवान बाबा सारखे हिरे घडवले तसेच लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम बंकट स्वामी महाराज यांनी केले. असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



श्री क्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवाला भेट दिली असता ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर ह.भ.प. महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, संभाजी महाराज आगळे, भास्कर महाराज शिंदे, ह.भ.प.स्वामी प्रकाशानंद गिरी महाराज, ह.भ.प.किसन महाराज पवार, ह.भ.प.नाना महाराज कदम, सुरेश महाराज जाधव, दिनकर कदम, अरुण डाके. विलास बडगे, नानासाहेब काकडे, भारत काळे, राजाभाऊ शेळके, सखाहरी गदळे, महेंद्र फुटाणे, बाजीराव काळे, गणेश पाटील, अभिमान शिंदे, राजाभाऊ शेळके, पोपट मते, चक्रधर शिंदे, अभिमन्यू काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे सुरू असलेल्या संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८१ व्या पुण्यतिथी उत्सवात माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी मनोगत व्यक्त केले पुढे बोलताना ते म्हणाले की, महाराष्ट्रात काकडा भजन, किर्तन परंपरेला समृद्ध करण्याचे श्रेय संत बंकस्वामी महाराज यांना जाते त्यांनी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे २४ वर्ष अध्यक्षपद भूषवले. लोक पावलेली वारकरी परंपरा पुनर्जीवित करण्यासह संप्रदायाला बळ देण्याचं काम बंकट स्वामी महाराज यांनी केले. संत वामन भाऊ, संत भगवान बाबा यांना घडवण्याचे काम बंकट स्वामी महाराजांनी केले. स्वातंत्र्याच्या अगोदर बहुजनातील सर्व जाती धर्माच्या व्यक्तींना सांप्रदायाचा कीर्तन भजनाचा अधिकार दिला व जाती तोडा आणि समाज जोडा हा मोलाचा संदेश बंकट स्वामी महाराजांनी दिला. बंकट स्वामी संस्थांचा आज विकास होत आहे यात खारीचा वाटा म्हणून जो काही हातभार लावता येतो तो मी नेहमी संस्थानचा भक्त या नात्याने कायम सेवेत राहील असेही ते म्हणाले. यावेळी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.




भीषण पाणी टंचाई संदर्भात बीड नगर परिषदेच्या विरोधात समस्त बीड शहरातील नागरिकांच्या वतीने शुक्रवारी भव्य हंडा मोर्चा काढण्यात आला. छाया-कृष्णा शिंदे

# शेतकऱ्यांनी सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगरला भेट देणाऱ्या नागरिकांच्या बहुतांशी तक्रारी या शेतरस्ते, पाणंदरस्ते वरील अतिक्रमणाबाबत असल्याचे निदर्शनास आल्याने या विषयाबाबत बीड जिल्ह्यातील सर्व सबंधित नागरिकांशी थेट संवाद साधण्याकरिता वेबिनारचे आयोजन करण्यात येऊन संबंधित नागरिकांसोबत संवाद साधण्यात आला.

त्यामधील मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा सहभाग शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करून देण्याच्या अनुषंगाने मागणी, महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदी मामलेदार मधील तरतुदी मामलेदार कोर्ट अधिनियम १९०६ मधील तरतुदी आणि वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णय, परिपत्रके तसेच मंत्री, (महसूल) महाराष्ट्र राज्य यांनी शेत रस्त्यावर अवलंबित असलेली प्रकरणी एका महिन्यात निकाली काढण्याबाबत निर्देशाच्या अनुषंगाने तालुक्यातील शेतरस्ते,पाणंद अतिक्रमणाबाबत प्रभावी कार्यवाही करणे गरजेचे असल्याने. सर्वोच्च न्यायालय तसेच उच्च न्यायालय यांच्याकडील निर्देशानुसार जिल्ह्यातील तालुकास्तरावर वेळोवेळी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणात तडजोड होऊन जलद गतीने प्रकरणाचा निपटारा व्हावा व सामान्य जनतेस न्याय मिळावा यासाठी वेळोवेळी लोक आदालतीचे आयोजन करण्यात येते. त्याच धरतीवर सामान्य शेतकऱ्यांना अतिक्रमित शेतरस्ते, पाणंद रस्ते मोकळे करण्यासाठी जलद न्याय मिळावा व प्रकरणाचा तातडीने निपटारा व्हावा यासाठी शासनाच्या सर्व सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना पंधरा दिवसातून एकदा एका ठिकाणी तहसील कार्यालयात आणि मंडळ मुख्यालयाच्या ठिकाणी 'सस्ती अदालत'या नावाने बीड जिल्ह्यातील ११ तालुक्यात 'सस्ती अदालत' हा उपक्रम राबविण्यासाठी महिन्यातील दुसरा व चौथा शुक्रवार या दिवशी राबविण्यात येणार आहे सबब शेतरस्ते,पांदण रस्तयाबाबत तक्रारी असलेल्या शेतक-यांनी या सस्ती अदालतीचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी केले आहे.



बीड-जिल्ह्यातील पोलिसांची एकमेव पतसंस्था असलेल्या बीड जिल्हा पोलीस पतसंस्थेची निवडणूक गुरुवारी (दि. ८) बिनविरोध पार पडली. सलग तिसऱ्यांदा अध्यक्ष पदाचा बहुमान अशोक दुबाले यांना मिळाला असून मागच्या दोन टर्ममध्ये त्यांचे पतसंस्थेवरील वर्चस्व आता पुन्हा एकदा निर्विवादपणे सिद्ध झाले आहे.यावेळी उपाध्यक्ष म्हणून संघर्ष गोरे यांची फेरनिवड करण्यात आली.

# चौसाळा महाविद्यालयाच्या निकालाची परंपरा कायम ९८.१५ टक्के निकाल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

दिनांक ५/५/२०२५ नवगण शिक्षण संस्थेच्या कला व विज्ञान महाविद्यालय कड.उ बोर्ड परीक्षेच्या निकालामध्ये चौसाळा महाविध्यालयाला घवघवीत यश मिळाले असून खालील विद्यार्थी गुणवत्ता यादीत विशेष प्राविण्य उत्तीर्ण झाले आहेत.कला शाखेतून ९७.४४ टक्के व विज्ञान शाखा ९९.२३ टक्के निकाल लागलेला असून विज्ञान शाखेतून कु. काळसे अंकिता अनिल ५३३ गुण घेऊन ८८.८३ टक्के गुण घेऊन महाविद्यालयातून प्रथम आलेली आहे.

तसेच द्वितीय क्रमांकाने कु. नाईकवाडे अंकिता अजिनाथ ५२३ गुण व ८७.१७ टक्के व कु. चव्हान अस्मिता रंगनाथ द्वितीय क्रमांक व कु. चौधरी राजनंदिनी शिवाजी तसेच कला शाखेतून कु.मोरे अनुराधा गणेश ८४.१७ टक्क्याने प्रथम आणि द्वितीय कु. झांबरे मयुरी ८३ टक्के तसेच गवळी मोहिनी अश्रुबा ८०.८३ गुणांनी तृतीय आलेली असून या यशाबद्दल यशस्वी विध्यार्थ्याचे संस्थेचे पदाधिकारी डॉ. दीपाताई क्षीरसागर , डॉ. योगेश भैया क्षीरसागर डॉ.सारीकाताई क्षीरसागर संस्थेचे प्रशासक डॉ. विश्वंभर देशमाने डॉ. सुधाकर गुट्टे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास भिल्लारे कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य गणपती ढवळशंख पी. जी. डायरेक्टर डॉ. सुधाकर वणवे इत्यादींनी अभिनंदन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्याचे सर्वत्र अभिनंदन होत असून या वर्षी सुद्धा घवघवीत यश संपादन करून ग्रामीण भागातील महाविद्याल याच्या निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.असून या वर्षी सुद्धा घवघवीत यश संपादन करून ग्रामीण भागातील महाविद्याल याच्या निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

# भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा स्वामी समर्थांचा मंत्र ऊर्जा देणारा, आधार देणारा-माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर


**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

अक्कलकोट स्वामी महाराजांच्या प्रमुख मठापैकी एक महत्त्वाचा सांप्रदायिक मठ असा नावलौकिक असलेला केज येथील समर्थ मठ असून भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा समर्थांचा मंत्र माणसाला ऊर्जा देणारा आधार देणारा असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.



केज येथे श्री स्वामी समर्थ मठ संस्थानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी भेट देऊन स्वामी समर्थांच्या पादुकांचे दर्शन घेतले तसेच यावेळी सुरू असलेल्या कथेचे श्रवण केले. यावेळी महोत्सव समितीच्या वतीने माजी मंत्री क्षीरसागर यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी ह.भ.प. भालचंद्र देव, विलास बडगे,दिनकर कदम,अरुण डाके,नानासाहेब काकडे,हर्षद क्षीरसागर आदींची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की,केज शहरात स्वामी समर्थ यांच्या स्वतःहून दिलेल्या पादुका आणि त्यांचे वापरातील वस्तू दीडशे वर्षांपासून पूजल्या जात आहेत. या मठाच्या स्थापनेला दीडशे वर्ष झाले असले तरी याद्वारे दरवर्षी पाडव्याला मोठा उत्सव साजरा केला जातो आणि स्वामींचे स्मरण भक्ती भावाने केले जाते. अक्कलकोट येथे केजकर स्वामींची समाधी आहे.निरंतर देशपांडे यांची ही परंपरा अखंडित सुरू आहे. इथे प्रत्येकजण जोडला जातो परस्पर भावना जोडून ठेवणारा हा मठ असून बीड जिल्ह्याचा हा ठेवा आहे. अनेक संप्रदाय आहेत त्यात श्रीदत्त संप्रदाय हा पण एक सरळ जीवन जगण्याचा मार्ग दाखवणारा आहे. स्वामी समर्थ हे कुठल्याही अंधश्रद्धा न बाळगता वास्तवात जीवन कसे जगावे,संस्कारित आयुष्य कसे जगावे हेच सांगतात,भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे हा मूलमंत्र देऊन त्यांनी रंजल्या गांजल्या लोकांना ऊर्जा दिली. भक्ती भावाने समर्पण करत जो भक्त स्वामींकडे येतो त्याच्या आयुष्याचे कल्याण होते असे अनेकांचे अनुभव आहेत म्हणूनच भक्त स्वामींच्या कृपाशीर्वादाने सुखी जीवन जगत आहेत. बीड जिल्हा हा अध्यात्मिक श्रीमंती लाभलेला जिल्हा आहे त्यामुळेच अनेक गावे समृद्ध झाली आहेत असे सांगून त्यांनी सुरू असलेल्या ह.भ.प. भालचंद्र देव यांच्या कथेचे श्रवण केले यावेळी प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, समर्थ भक्त सर्व देशपांडे परिवार यांच्यासह भाविक भक्तांची उपस्थिती होती.

# सौ कल्पना पारस बोरा यांचे अल्पशा आजाराने निधन



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

जुना नगर नाका येथील प्रतिष्ठित व्यापारी पारस शांतीलाल बोरा यांच्या पत्नी कल्पना बोरा वय(४९ )याचे अल्पशा आजाराने दुःखत निधन दिनांक ०६/०५/२०२५ रोजी सायंकाळी ६ वा दुःखद निधन झाले . त्यांच्या पश्चात ३ मुली व १ मुलगा असा परिवार आहे.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३१ मे २०२५ रोजी त्रिशताब्दी जयंती आहे. त्या निमित्त धनगर समाज अहिल्या महिला आघाडी आणि बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१० ते ३१ मे २०२५ या कालावधीत महिला व युवतींसाठी मोफत लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले असून बीड शहरातील महिला व युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते (डोमाळे) यांनी केले आहे.

ज्याप्रमाणे छत्रपती शिवाजी महाराज उत्तम आणि महान राजे होते त्याच प्रमाणे अहिल्यादेवी होळकर या देखील स्त्रियांमधील उत्तम राज्यकर्ती होत्या. यावर्षी महाराष्ट्रासह भारतात त्यांची त्रिशब्दी जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. याच अनुषंगाने महिला व युवतींवर होणार्या अन्याय,अत्याचारावर वचक बसावा आणि महिला व युवती या निर्भिड व्हाव्यात यासाठी बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने दि.१० मे २०२५ पासून छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सायं.५ ते ६ या वेळेत लाठी-काठी प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच दि. २८ मे रोजी रांगोळी स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली असून स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षीस व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या कला-गुणांना वाव मिळावा यासाठी निबंध स्पर्धा देखील घेण्यात येणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनावर महिला, युवक, युवतींनी तसेच विद्यार्थ्यांनी दि.३१ मे २०२५ पर्यंत आपले निबंध बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था कार्यालय पिंपरगव्हाण रोड, काळे कॉम्प्लेक्स इमारत येथे द्यावेत अधिक माहितीसाठी संस्थेच्या अध्यक्षा मिनाक्षीताई देवकते-डोमाळे, मो. ९०७५५५८८०७, ८२३७९१९१६२ यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# व्यापारी महासंघाच्यावतीने विवेक जॉन्सन यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**



बीडचे नूतन जिल्हाधिकारी , विवेक जॉन्सन्स यांचा बीड जिल्हा व्यापारी महासंघाच्या कार्यकारिणी सदस्यांनी भेट घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचा बीड जिल्हा व्यापारी कार्यकारणीने सदिच्छा भेट व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी व्यापाऱ्यांच्या काही अडचणी असतील तर त्या सोडविण्या साठी मी कायम शासनदरबारी तत्पर असेल व व्यापाऱ्याला प्रशासनाचे नेहमीच सहकार्य राहील असे त्यांनी सांगितले . यावेळी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष भास्कर जाधव , कार्याध्यक्ष अशोक शेटे , बीड शहर अध्यक्ष प्रकाश कानगावकर , सचिव सूर्यकांत महाजन , होलसेल किराणा अध्यक्ष जवाहरलाल कांकरिया , लइक अहमद , इ. व्यापारी बांधव उपस्थित होते .

# आदित्य नर्सिंग महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना निरोप समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

आई-वडील जसे आपल्या लेकरावर जीव लावतात तसाच जीव आपण रुग्णसेवा करताना आपल्याकडे आलेल्या रुग्णा प्रति दाखवावा. जेणेकरून रुग्णाची केलेली सेवा हीच ईश्वराची सेवा ठरेल. आदित्य नर्सिंग महाविद्यालयामधील पहिली विद्यार्थ्यांची बॅच बाहेर पडताना एका डोळ्यामध्ये अश्रू तर दुसऱ्या डोळ्यांमध्ये आनंद आहे. उद्या माझे विद्यार्थी रुग्ण सेवेचे दायित्व यशस्वीपणे पार पाडतील यामध्ये कोणतीही शंका नाही. असे प्रतिपादन वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले. बीड शहरातील आदित्य शिक्षण संस्थेच्या आदित्य नर्सिंग महाविद्यालयाच्या अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून संचालिका डॉ. आदिती सारडा या बोलत होत्या. कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्याम भुतडा यांची होती. व्यासपीठावर डॉ. आदिती सारडा, प्राचार्य प्रा. विकास गर्जे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. आदिती सारडा म्हणाल्या की, आदित्य शिक्षण संस्थेतील विद्यार्थी प्रत्येक क्षेत्रात आहेत. देशासह परदेशातही मोठ-मोठ्या पदावर आज आदित्य शिक्षण संस्थेचे विद्यार्थी कार्यरत आहेत.

# भागुजीराव ढेकळे कनिष्ठ महाविद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१%

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.९ मे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने फेब्रुवारी, मार्च मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेचा निकाल जाहिर झाला असून पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा शेकडा निकाल ९८.६१% एवढा लागला असून यावर्षी पण या कनिष्ठ महाविद्यालयाने उज्वल निकालाची परंपरा कायम राखली आहे.

कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातून बारावीच्या परीक्षेला २८९ विद्यार्थी बसले होते त्यापैकी २८५ विद्यार्थी उत्तीर्ण होवून शेकडा निकाल ९८.६१% इतका लागला असून विज्ञान व वाणिज्य शाखेचा १००% तर कला शाखेचा ९५.७८% एवढा निकाल लागला. यात विशेष प्राविण्यात ११५ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १४४, द्वितीय श्रेणीत २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आदर्श शिक्षण संस्थेचे सचिव माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, युवा नेते रोहित क्षीरसागर, संस्थेचे प्रशासन अधिकारी डॉ.राजा मचाले, सहाय्यक प्रशासन अधिकारी योगेश पवार, कार्यवाहक एम. ए. राऊत, प्रकाश राठोड, कृषि पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य थिटे ए. एस., सर्व कर्मचारी व ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

बीड विभागीय कार्यालय : आदर्शनगर गणपती मंदिरासमोर पांगरी रोड, बीड मो.९४०३२६४९३०, E-Mail - jagannathdeshmukh2020@gmail.com

# श्री क्षेत्र माहूरगडसाठी तब्बल ८२९ कोटीच्या विकास आराखड्याला मंजुरी

**तभा वृत्तसेवा**
**माहूर, दि. ०९ मे-**

राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून त्यांच्या मंदिर पुनर्निमाणाच्या कामाला अभिवादन म्हणून राज्यातील प्रसिद्ध तिर्थक्षेत्राच्या विविध सात मंदिराच्या विकासासाठी ५५०३.६९ कोटी रुपयांचे मंदिर विकास आराखड्यास

मंत्रिमंडळाच्या बैठकीत नुकतीच मान्यता देण्यात आली असून, त्यात राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक प्रसिद्ध तिर्थक्षेत्र माहूरगडच्या विकासासाठी तब्बल ८२९ कोटी रुपयांच्या विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे.या निर्णयाचे माहूर शहरवासीयांसह लाखों भाविकांनी जोरदार स्वागत केले आहे. यासाठी किनवट- माहूर विधानसभेचे भाजपचे आमदार भीमराव केराम जे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे अत्यंत विश्वासू निकटवर्तीय समजले जातात त्यांनी याकामी शासनदरबारी निरंतर केलेल्या पाठपुराव्याला मिळालेले हे मोठे यश असल्याचे राजकीय वर्तुळात मानले जात आहे.



राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंती निमित्त अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत ५५०३.६९ कोटी रुपयांच्या विविध सात ठिकाणच्या मंदिर विकास आराखड्याला मंजुरी देण्यात आली आहे. ज्यात तिर्थक्षेत्र माहुरच्या विकासासाठी ८२९कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून आ.भीमराव केराम यांच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे.

केंद्रात नरेंद्र मोदी व राज्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात सरकार स्थापन झाल्यानंतर आ. भीमराव केराम यांच्या प्रयत्नामुळे तिर्थक्षेत्र माहुरच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला असल्याने, गडावर जाण्यासाठी सी.सी.रस्ता, श्री रेणुकामाता मंदीरात दिव्यांग,जेष्ठ नागरिकांना दर्शनाला जाण्यासाठी लिफ्ट व स्कायवॉक, शहरातील राष्ट्रीय महामार्ग,ग्रामीण रुग्णालयासाठी सुसज्ज इमारत, ऑक्सिजन प्लांट, डायलिसिस सेंटर, रुग्णवाहिका, शहरातील सी.सी. रस्ते ईत्यादिसह अन्य महत्त्वपूर्ण ठिकाणी तिर्थक्षेत्र माहूरचा गतिमान विकास झाला असून चौंडी येथील मंत्रीमंडळ बैठकीत तिर्थक्षेत्र माहूरच्या विकासासाठी ८२९कोटींचा विकास निधीला मंजुरी देण्यात आली असल्याने तिर्थक्षेत्र माहूरच्या विकासाचा गाडा आता अधिक गतिमान होणार असून, दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.माहूर तिर्थक्षेत्र विकासासाठी ८२९कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला ही बाब निश्चितच माहुर वाशियांसह कोट्यवधी भाविकांसाठी आनंददायी बाब आहे.यामुळे माहूरगडाच्या धार्मिक वैभवात निश्चितच आणखी भर पडेल. मंत्रीमंडळाच्या या निर्णयाचे शहरवासीयांसह लाखों भाविकांकडून स्वागत केले जात आहे.

**सर्व मंत्र्यांचे माहूर शहरवासीयांसह लाखों भाविकांकडून आभार: -आ. भीमराव केराम**

महाराष्ट्रातील लाखों भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या तिर्थक्षेत्र माहुरच्या विकासासाठी सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा केला यासाठी अनेक वेळा मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व पर्यटन मंत्र्यांची भेट घेतली. केंद्रीय मंत्री नितिन गडकरीं, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांनी वेळोवेळी माझ्या मतदारसंघाच्या विकासासाठी भरघोस निधी उपलब्ध करून दिला. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील चौंडी येथे नुकतीच पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत तिर्थक्षेत्र माहूरसाठी ८२९कोटींचा भरीव निधी मंजूर केला त्याबद्दल सर्व मंत्रिमहोदयांचे माहूर शहरवासीयांसह लाखों भाविकांकडून आभार मानतो.

## संक्षिप्त वृत्त

### हज यात्रेकरूंसाठी अतिरिक्त रेल्वे कोच उपलब्ध करून द्यावेत



**नांदेड**-सध्या भारतातील विविध विमानतळांवरून हज यात्रेकरूंचे प्रस्थान सुरू आहे. या वर्षी, नांदेडहून अंदाजे ९०० हज यात्रेकरू रवाना होत आहेत. २६ मे रोजी मुंबईहून सर्वात जास्त संख्येने हज यात्रेकरू रवाना होणार आहेत. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने नांदेड रेल्वे व्यवस्थापकांची भेट घेतली. नांदेडचे खासदार रविंदर चव्हाण यांचे एक निवेदन सादर केले, ज्यामध्ये २३, २४ आणि २५ मे रोजी नांदेडहून सुटणाऱ्या नंदीग्राम, देवगिरी आणि राज्यराणी एक्सप्रेस गाड्यांमध्ये किमान दोन अतिरिक्त स्लीपर कोच जोडण्याची मागणी करण्यात आली. नांदेडमधील हज यात्रेकरू आणि त्यांच्यासोबत मुंबईला जाणारे त्यांचे नातेवाईक यांनी आरक्षण केले आहे, परंतु तिकिटे प्रतीक्षा यादीत आहेत. त्यामुळे रेल्वे विभागाकडे मागणी करण्यात आली की, अतिरिक्त कोचची व्यवस्था करून नांदेडमधील सर्व हज यात्रेकरूंचे आरक्षण निश्चित करावे. त्याचबरोबर हज यात्रेकरूंच्या प्रस्थानानिमित्त नांदेड रेल्वे स्थानकावर अतिरिक्त पोलिस बंदोबस्त ठेवण्यात यावा. शिष्टमंडळात काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष शमीम अब्दुल्ला, माजी उपमहापौर अब्दुल गफ्फार, काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष रहीम अहमद खान, शहराध्यक्ष अब्दुल अजीज कुरेशी, काँग्रेस जिल्हा कार्याध्यक्ष विठ्ठल पावडे, सुरेश हटकर, पक्षाचे प्रवक्ते मुंतजीब, माजी नगरसेवक सय्यद शोएब हुसेन, अब्दुल हबीब बागबान, फिरोज, मुहम्मद जुबेर अहमद आदींचा समावेश होता.

### जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालतीचे आयोजन

**नांदेड**-नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या अडचणीचे निवारण करण्यासाठी मे महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी १३ मे २०२५ रोजी सकाळी ११ ते १.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय येथे पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. सेवानिवृत्त झालेले अधिकारी कर्मचारी यांनी अडचणी निवारण्यासाठी पेन्शन अदालतीच्या दिवशी उपस्थितीत राहून तक्रारीचे निवेदन द्यावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी नांदेड यांनी केले आहे.

### श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारडच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



**मुदखेड**-स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ बारड संचलित श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारडचा बारावी बोर्ड परीक्षा २०२५ चा निकाल ९१.१६% लागला असुन विज्ञान शाखेचा १००% तर कला शाखेचा ८५.५३% कला शाखेतून कु. आरती धुरपत नादरे ८२.१६% टक्के गुण घेवून प्रथम, कु. स्नेहा परमेश्वर मुसळे ८२.००% व्दितीय तर कु शिवानी रंजित मुसळे ८०.५० तृतिय क्रमांक मिळवला तर विज्ञान शाखेत कु राजेवार कांचन कैलाश ८६.६७% घेवून प्रथम, कु. हरण वैष्णवी नारायण ८४.६७% व्दितिय, कुं राठोड दिव्या प्रभाकर ८१.१७% व कु शेख खिजरा शेख दौलत या दोन विद्यार्थीनी तृतिय आल्या असुन सर्व बारावी उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थ्याचे स्वामी विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे अध्यक्ष संजयराव देशमुख, उपाध्यक्ष रमेशचंद्र महाजन, सचिव रामेश्वर कोरबनवाड व सर्व कार्यकारी मंडळ व श्री शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय बारड तालुका मुदखेड जिल्हा नांदेड प्राचार्य हेमंत इंगळे व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर वृंदांच्या वतीने मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन करून उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आणि सर्व स्टॉफ ने सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांचा घरी जाऊन पालकासमवेत गुणगौरव करण्यात आला.




# आ. बोंढारकर यांच्याकडून नुकसान ग्रस्त गांवाची पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड, दि. ०९ मे-**

जिल्ह्यात काल सायंकाळी अचानक सुरू झालेल्या वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून नांदेड दक्षिणेचे आमदार आनंदराव बोंढारकर यांनी त्यांच्या मतदार संघातील अनेक गावांना भेटी देऊन नुकसानीची पाहणी केली आहे. महसूल विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याची सुचना केली आहे.



नांदेड जिल्ह्यातील व शहरात ५ मे रोजी सायंकाळी अचानक वादळी वारे वाहण्यास सुरवात झाली. या वादळी वाऱ्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील, केळी, अंबा,पपई पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच ग्रामीण भागातील घरावरील पत्रे उडून गेले आहेत. शेतकऱ्यांच्या शेतातील वैरण व कडबा उडून गेला. नांदेड दक्षिण विधानसभा मतदार संघातील गावांना मोठा फाटका बसल्याचे लक्षात येताच आमदार आनंदराव बोंढारकर यांनी शासकीय फौजफाटा घेऊन मतदार संघातील नुकसान ग्रस्त गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांना दिलासा दिला आहे. नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील बेटसांगवी, भनगी, गंगाबेट, मार्कंड, कल्हाळ यागावांमध्ये प्रत्यक्ष जाऊन आमदार आनंदराव पाटील बोंढारकर यांनी आज केळी, आंबा, पपईच्या बागांची पाहणी केली. व संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामा करण्याच्या आमदार आमदार बोढांरकर यांनी सूचना दिल्या आहेत. त्यांच्या सोबत यावेळी तहसीलदार विठ्ठल परळीकर, मंडळ अधिकारी कठारे, तलाठी मनोज सरपे, युवासेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील सपुरे,त्र्यंबक पाटील मोरतळे, बेटसांगवी सरपंच शिवाजी वानखेडे, भनगी गोविंदराव मोरे, पंढरी डाके, शिवाजी डाके यांच्यासह अधिकारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# नांदेड शहरात लोडशेडींगच्या अनुषंगाने आज बैठक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ०८ मे-**

नांदेड शहरातील अनेक भागात सध्या वारंवार लोडशेडींग होत आहे. या प्रकरणात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून लोडशेडींगमुळे विद्युत पुरवठा खंडीत होण्याच्या या घटनेच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी शनिवार १० मे २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयातील त्यांच्या बैठक कक्षात सकाळी ११ वा. बैठक आयोजित केली आहे.

बैठकीस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, विद्युत वितरण कंपनी नांदेड शहर, नांदेड ग्रामीण तसेच सर्व संबंधित अधिकारी, संबंधीत क्षेत्रीय अधिकारी यांनी अद्यावत माहितीसह उपस्थित राहावे, असे निर्देश अपर जिल्हादंडाधिकारी नांदेड यांनी दिले आहेत.

# पी. एम. पी. एल. च्या कामावरती वॉच कुणाचा जिल्हाधिकारी कारवाई करतील का ?

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. ०९ मे-**

वर्धा- यवतमाळ- नांदेड या लोहमार्गाच्या हदगाव तालुक्यातील अंतर्गत येणाऱ्या रेल्वे लाईनच्या काम घेतलेल्या पी.एम.पी.एल या कंपनीने आतापर्यंत पर्यावरणाचा बेसुमार ऱ्हास करत, शेकडो झाडांची कत्तल करत, असंख्य वन्य प्राण्यांची मृत्यूस कारणीभूत असलेल्या, नागरिकांच्या जीवावर उठलेल्या तसेच महसूल प्रशासनास कायमच ठेंगा दाखविणाऱ्या कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडविणाऱ्या या पी. एम. पी. एल च्या उधळलेल्या बेभाण वळूच्या नाकात वेसण आता कोण घालणार ? असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत असून मुख्यमंत्र्यांच्या हस्ते शाबासकी मिळवणारे जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या प्रकरणात लक्ष घालावे अशी मागणी जनतेतून प्रखरपणे समोर येत आहे.

हदगाव तालुक्यातील जनता हे नेहमीच विकासाच्या बाजूने ठामपणे उभी असते तर वेळे प्रसंगी आंदोलन करून विकास कसा करून घ्यायचा याचा पूर्व इतिहास राहिलेला आहे. जेव्हापासून रेल्वे मार्ग आपल्या भागातून जाणार याचा आनंद सर्वांना झाला पण त्यावर विरंजण पडले त्या पीएमपीएल कंपनीच्या काम करण्याची



पद्धतीने अगोदरपासूनच या कंपनीने सर्व नियम धाब्यावर बसवीत बेसुमार वृक्षांचे कत्तल करत पर्यावरणाचा समतोल बिघडून मोठ्या प्रमाणावर पर्यावरणाचा नाश करण्यात आला. यात कहर म्हणजे यांच्या हायवा व टिप्पर मुळे शेकडो वन्यप्राणी मृत्युमुखी पडल्याची नागरिकांतून चर्चा होत आहे. गौण खनिज चोरी करत कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवीत या कंपनीने अक्षरशः कहर माजविला आहे तरी यांच्यावर महसूल प्रशासन कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी होत आहे तर महसूल प्रशासनात तील एक कठोर व अवैध काम करणाऱ्या वरती कर्दनकाळ म्हणून ओळख असलेले जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आता या प्रकरणात लक्ष घालावे अशी मागणी या निमित्ताने होत आहे.

# विविध खेळांचे उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ०९ मे-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड व नांदेड जिल्हा एकविध खेळ संघटना यांचे संयुक्त विद्यमाने विविध खेळांचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन १५ ते ३० मे २०२५ या कालावधीत सकाळी ६ ते सायं.८ व सायं ५.३० ते ७.३० या वेळेत जिल्ह्यातील विविध स्थळी आयोजित करण्यात येणार आहे.

एकविध खेळ संघटनेचे पदाधिकारी, क्लब, अकादमी व क्रीडा प्रशिक्षक, मार्गदर्शक यांनी ज्या खेळांचे प्रशिक्षण शिबिर आपण घेणार आहात त्या खेळांचे नाव व प्रशिक्षण स्थळ तसेच प्रशिक्षणाची वेळ सकाळ व संध्याकाळ नमुद करुन तसे लेखी पत्राद्वारे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय येथे कळवावे.

या प्रशिक्षण शिबिरादरम्यान जे प्रशिक्षणार्थी सहभागी होऊ इच्छितात त्यांनी आपले नाव व खेळ बाब नमूद करावी व तसा फॉरमॅट फॉर्म जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयात उपलब्ध राहील. उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिर यशस्वी संपन्न करावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

